रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ५२
www.ramprahar.com
गुरुवार, ७ सप्टेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## निजामकालीन नोंदी असलेल्यांना कुणबी दाखले मिळणार



**मुंबई** : जालना येथे मराठा आरक्षणाची मागणी करीत गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाची राज्य सरकारने दखल घेत पावले उचलली आहेत. या संदर्भात बुधवारी (दि. ६) राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, ज्यांच्या महसुली, शैक्षणिक आणि निजामकालीन नोंदी असतील त्यांना कुणबी दाखले देणार असून त्यासाठीची जी कार्यपद्धती व पडताळणी आहे ती करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांची समिती गठीत करण्यात आली असल्याची माहिती दिली. या समितीमध्ये पाच सदस्य असतील. महसूल सचिव समिती या निवृत्त न्यायाधीशांच्या समितीला मदतही करेल. पुढच्या एक महिन्यात निवृत्त न्यायाधीशांची समिती अहवाल सादर करेल. त्यानंतर दाखले दिले जातील. यासंबंधीचा जीआरही काढण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.


### अंतरंग
आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवण्याची फॅशन/४
रायगड जिल्ह्यात दहीहंडी उत्सवावर पोलिसांची नजर/७
पावसाळी क्रीडा स्पर्धेत नांदगाव हायस्कूलचे यश/८


# राज्यात सायबर सुरक्षेसाठी प्रकल्प

### मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

सायबर गुन्ह्यांना लगाम घालण्यासाठी राज्यात सायबर सुरक्षा प्रकल्प राबविण्यात येणार असून त्यासाठी ८३७ कोटी ८६ लाख रुपयांच्या तरतुदीस राज्य मंत्रिमंडळाच्या बुधवारी (दि. ६) झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

वाढत्या सायबर व इतर गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी राज्यात सायबर सुरक्षा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यामध्ये आधुनिक सायबर सुरक्षा लॅबची उभारणी, कमांड अ‍ॅण्ड कंट्रोल सेंटर, टेक्नॉलॉजी असिस्टेड इन्वेस्टिगेशन, सेंटर ऑफ एक्सलेंस, सर्ट महाराष्ट्र, क्लाउड आधारित डेटा सेंटर, सिक्युरिटी ऑपरेशन सेंटर, यांचा समावेश असणार आहे.

याशिवाय मेट्रो कारशेडसाठी ठाणे मोघरपाडा येथील जागा एमएमआरडीएला हस्तांतरीत करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे ठाण्यातील प्रकल्पांना गती मिळणार आहे. मुंबईत जानेवारीत आंतरराष्ट्रीय महोत्सव आयोजित करण्याच्या पर्यटन विभागाच्या प्रस्तावालाही बैठकीत मान्यता देण्यात आली.

आर्थिक अडचणीतील सहकारी साखर कारखान्यांना राज्य सहकारी बँकेकडून शासन हमीवर कर्ज उपलब्ध करण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला. एनसीडीसीपेक्षा कमी व्याजदरात हे कर्ज मिळणार आहे. त्याचप्रमाणे केंद्राच्या विविध कंपन्यांना मुद्रांक शुल्कात संपूर्ण सूट देण्यासह मध्य नागपूरमधील झोपडपट्टीतील घरांसाठी मुद्रांक शुल्कात कपात करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

# पनवेल महानगरपालिका शिक्षणात अव्वल ठरेल -आमदार प्रशांत ठाकूर

### शाळा झाल्या डिजिटल; क्लासरूमचे उद्घाटन





**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वतीने सर्व शाळा डिजिटल करण्यात आल्या आहेत. या डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन लोकनेते दि.बा.पाटील शाळेमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. ६) झाले. या वेळी त्यांनी येणाऱ्या काळात पनवेल महापालिका शिक्षणाच्या बाबतीत अव्वल ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमास मनपा आयुक्त गणेश देशमुख, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक नितीन पाटील, अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त गणेश शेटे, कैलास गावडे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शिक्षण विभाग प्रमुख किर्ती महाजन, सन सिस्टम कंपनीचे लक्ष्मण वायकर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, छडी लागे छमछम, विद्या येई घमघम पूर्वी खूप प्रसिद्ध होते. विद्यार्थ्यांकडून घोटवून घेऊन त्याला परीक्षेत लिहायला लावण्याच्या संकल्पनेतून देश बाहेर पडला आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी त्याला दृक्श्राव्य माध्यमाचा लाभ घेता आला पाहिजे. या माध्यमातून कितीही जटील संकल्पना सोप्या पद्धतीने शिकविली जाते. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होतो. पनवेल महापालिकेच्या शाळा डिजिटल झाल्याने येणाऱ्या काळात हे विद्यार्थीही विविध स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळवतील, खासगी शाळांनाही त्यांची दखल घ्यावी लागेल. (पान ७ वर..)

#### अशी आहे संकल्पना

एमएमआरडीए भागात डिजिटल क्लासरूम करणारी पनवेल ही एकमेव महापालिका आहे. या महापालिकेच्या ११ शाळांमध्ये एकूण ५७ डिजिटल बोर्ड बसविण्यात आले आहेत. पिपल लिंक कंपनीच्या या डिजिटल बोर्डमध्ये कम्प्युटर जोडलेला आहे. डिजिटल बोर्डमध्ये मराठी, उर्दू, गुजराती अशा तीन माध्यमांतील पहिली ते सातवीच्या वर्गांचा सर्व विषयांचा अभ्यासक्रम आहे तसेच युट्यबचा पर्याय यावर आहे. कम्प्युटरप्रमाणे यामधील हव्या असणाऱ्या वर्गाच्या, हव्या त्या विषयातील धड्यावर जाऊन सिलेक्ट केले असता अ‍ॅनिमेटेड स्वरूपात तसेच शिक्षक शिकवतात त्याप्रमाणे सर्व अभ्यासक्रम स्क्रीनवर दिसणार आहे.

**आज आमच्या शाळेत डिजिटल बोर्डचे उद्घाटन झाले आहे. डिजिटल पद्धतीने शिकवताना विद्यार्थ्यांना खूप छान वाटणार आहे. शिकवलेले जास्त लक्षात राहिल. कविता, गाणी, साउंड म्युझिकमुळे पाठांतर क्षमता वाढणार आहे.**

**-अनुपमा डामरे, मुख्याध्यापिका, लोकनेते दि. बा. पाटील शाळा, पनवेल**

## माणगावमध्ये सरावादरम्यान भाला लागून विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू



**माणगाव : प्रतिनिधी**

सराव करताना भाला लागून १५ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना माणगाव तालुक्यातील पुरार येथील आयएनटी शाळेच्या मैदानावर बुधवारी (दि. ६) दुपारी घडली. हुजेफा कुदबुद्दिन डावरे असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे.

याबाबत गोरेगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार घटनेतील मयत मुलगा हुजेफा डावरे (रा. दहिवली कोंड, ता. माणगाव) हा आयएनटी शाळेचा विद्यार्थी असून बुधवारी दुपारी १२.३०च्या सुमारास शाळेच्या आवारात भालाफेकीचा सराव सुरू असताना त्याच्या डाव्या डोळ्याच्या बाजूला भाला लागून तो गंभीर जखमी झाला. त्याला उपचाराकरिता गोरेगाव प्राथमिक रुग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासून त्याचा मृत्यू झाला असल्याचे सांगितले.

या घटनेची नोंद गोरेगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली असून या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

## इंडिया आघाडीला धक्का!

**स्वतंत्र निवडणूक लढण्याची आपची घोषणा**

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीला मोठा धक्का दिला आहे. पंजाब सरकारमधील मंत्री अनमोल गगन मान यांनी बुधवारी (दि. ६) पत्रकार परिषद घेऊन पंजाबच्या १३ जागांवर आप स्वतंत्र लढणार असून काँग्रेससोबत कोणत्याही प्रकारे आम्ही जागावाटप करणार नाही, असे स्पष्ट केले.

मंत्री गगन मान यांनी पुढे सांगितले की, पंजाबमध्ये आम्ही भगवंत मान यांच्या नेतृत्वामध्ये निवडणुका लढवणार आहोत. आम आदमी पक्षाच्या चिन्हावर निवडणुका लढवल्या जातील. आम्ही काँग्रेससोबत कोणतीही आघाडी करणार नाही. भगवंत मान यांच्यावर पंजाबचे लोक प्रेम करतात. लोकांनी इमानदार माणसाची निवड केली आहे. त्यामुळे काँग्रेससोबत आघाडी होणे शक्य नाही. आपच्या या पवित्र्यामुळे इंडिया आघाडीत फुट पडण्याची चिन्हे आहेत.

### निवडक

#### गणेश चतुर्थीपासून संसदेचे कामकाज नव्या वास्तूमधून

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने बोलावलेल्या संसदेच्या पाच दिवसीय विशेष अधिवेशनाला १८ सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. पहिल्या दिवशी संसदीय कामकाज सध्याच्या वास्तूत होणार आहे. दुसऱ्या दिवशी म्हणजे १९ सप्टेंबरपासून नव्या संसदेतून कामकाजाला सुरुवात होणार आहे. याचाच अर्थ गणेश चतुर्थीचा मुहूर्त पाहून संसदेच्या नव्या वास्तूत कामकाजाचा श्रीगणेशा होणार आहे. एएनआय वृत्तसंस्थेने या संदर्भात माहिती दिली आहे.

#### १ ऑक्टोबरपासून सिमकार्ड खरेदीसाठी येणार नवे नियम

**नवी दिल्ली** : सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने सिमकार्ड खरेदीबाबतच्या नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. १ ऑक्टोबरपासून हे नियम देशभरात लागू होतील. यानंतर एक व्यक्ती केवळ ठराविक सिमकार्ड खरेदी करू शकणार आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माहिती दिली. देशातील सायबर फ्रॉड, फसवणूक आणि स्कॅम कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून डॉ. भावेश जोशी यांना दोन लाखांची मदत

### [ वैद्यकीय शिक्षणासाठी सहकार्य ]



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परदेशातील वैद्यकीय शिक्षणासाठी नवीन पनवेल येथील डॉ. भावेश कृष्णा जोशी यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून दोन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे संस्थापक लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते डॉ. भावेश यांना मदतीचा धनादेश प्रदान करण्यात आला. या वेळी भाजप कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक बबन मुकादम आदी उपस्थित होते.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रांत गेल्या २५पेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतःच्या पायावर उभे केले जाते. डॉ. भावेश जोशी हे जर्मनी देशात मास्टर्स इन सर्जरी-जनरल सर्जरी विथ रोबोटिक या कोर्सचे शिक्षण घेणार आहेत. त्यांनी आर्थिक मदतीकरिता विनंती अर्ज केला होता. त्या अनुषंगाने त्यांना दोन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

## मॅच फिक्सिंगप्रकरणी श्रीलंकन खेळाडूला अटक

**कोलंबो : वृत्तसंस्था**

श्रीलंकेने आशिया चषक स्पर्धेत मंगळवारी विजय मिळववून सुपर ४ फेरीत प्रवेश केला, पण त्यानंतर श्रीलंकेवर नामुष्की ओढवली आहे, कारण त्यांच्या एका खेळाडूला मॅच फिक्सिंगच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे.

श्रीलंकेचा माजी क्रिकेटपटू सचित्रा सेनानायकेला बुधवारी मॅच फिक्सिंगच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. सेनानायकेवर लंका प्रीमियर लीगच्या २०२० साली झालेल्या हंगामात मॅच फिक्सिंग करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.


## 'ज्यांनी मराठा आरक्षण घालविले ते उद्धव ठाकरे माफी केव्हा मागणार?'



**मुंबई : प्रतिनिधी**

जालना येथे मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनावर पोलिसांनी लाठीचार्ज केला. यावरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सरकारवर टीका केली होती. या टीकेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर देत ठाकरेंवर आरोप केले. यावर ठाकरे यांनी या सरकारने राजीनामे द्यावेत, अशी मागणी केली आहे. याला आता भाजपने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

भाजपचे नेते आमदार आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे. उच्च न्यायालयात टिकणारे मराठा आरक्षण देणाऱ्या, पण पोलिसांच्या कारवाईसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागून मनाचा मोठेपणा दाखविला, पण ज्यांनी मराठा आरक्षण घालविले ते 'घरातील महामहीम' उद्धव ठाकरे हे माफी केव्हा मागणार? आमची अपेक्षा होती की आज स्वतः ते राज्यपालांना भेटून माझ्या काळात मराठा आरक्षण गेले, मी राज्याच्या तमाम जनतेची माफी मागतो, असे सांगतील, पण त्यांचे आपले तेच ते सुरू आहे. आधे इधर जाओ, आधे उधर जाओ, मै घर में बैठता हूं! असा टोला शेलार यांनी उद्धव ठाकरेंना ट्वीटमध्ये लगावला आहे.



# गोविंदा रे गोपाळा! विद्यार्थ्यांनी फोडली दहीहंडी

### रामशेठ ठाकूर विद्यालयात जन्माष्टमी उत्साहात साजरी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी बांधण्यात आलेली दहीहंडी विद्यार्थ्यांनी फोडली.

जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले होते. या वेळी श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर यांनी केले. विद्यार्थिनींनी श्रीकृष्णाचे पाळणा गीत गायले तसेच विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या विविध गाण्यांवर नृत्ये सादर केली.

या वेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधा यांच्या वेशभूषा केल्या होत्या. त्यामुळे विद्यालयाचा परिसर श्रीकृष्णमय झाला होता. विद्यालयाच्या प्रांगणात दहीहंडी बांधण्यात आली होती. ही हंडी मुला-मुलींमधून श्रीकृष्ण व राधा बनलेल्या विद्यार्थ्यांनी फोडली. या वेळी विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.



या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य निशा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली प्र.मुख्याध्यापक संतोष खांदेकर व उपक्रम विभाग प्रमुख स्वप्नाली पवार यांनी केले होते. कार्यक्रम उत्साहात पार पडण्यासाठी शिक्षक अभिजित जोगदंडे, संभाजी जाधव यांनी यशस्वी नियोजन केले.

# पनवेल महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग
**कार्यालय : देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल ४१०२०६**

---

दुरध्वनी कार्यालय : 022- 27458040/41/42    फॅक्स नं. : 022- 27452233
वैद्यकीय आरोग्य विभाग : 022 – 27455751    आयुक्त कार्यालय : 022- 27452339
ई-मेल : mohpmc05@gmail.com    वेबसाईट: www.panvelcorporation.com

---

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/ १९६४/सन 2023-24    `दिनांक:-06/09/2023

### पदभरती जाहिरात

वाचा :- 1. मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन 2022-23 नुसार मंजुर पदे
2. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं.राआसो/मनुष्यबळ कक्ष/सुधारित पदभरती समिती /10266-10600/2023 दि.26.04.2023 रोजीचे पत्र
3. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /10670-11016/2023 दि.27.04.2023 रोजीचे पत्र.
4. सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. रानाआअ/शैक्षणिक पात्रता/ एनयुएचएम/24004-24187/23 दिं 24.05.2023 रोजीचे पत्र.
5. 15 वित्त आयोग मार्गदर्शक सुचना.
6. मा. आयुक्त महोदयांची दि. 22.08.2023 रोजीची मान्यता टिपणी.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत, पनवेल महानगरपालिकेकरिता रिक्त असलेल्या पदांवर खालील दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी पदभरती प्रक्रियेद्वारे इच्छुक व पात्र उमेदवारांच्या नेमणुका पनवेल महानगरपालिका यांच्या स्तरावरून गठीत केलेल्या समितीमार्फत थेट मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहेत. यासाठी दि.13.09.2023 (दिवस बुधवार) पासुन प्रत्येक आठवडयातील प्रत्येक बुधवारी सकाळी 11.00 ते दु. 4.00 या वेळेमध्ये थेट मुलाखती आयोजित करण्यात येत आहेत (सदरहु पदे रिक्त असे पर्यंत ). सदर पदांसाठी अर्जाचा विहित नमुना पनवेल महानगरपालिकेच्या या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी वरील प्रमाणे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

| अक्र | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मासिक मानधन (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी Part Time Medical Officer | 12 | MBBS with Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 70 वर्ष | 30,000/- |

विशेषतज्ञ

| अक्र | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एका वर्षात एकूण भेटी | एकत्रित मासिक मानधन (रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| | भिषक (फिजीशियन) | 6 | 1) MBBS with MD | उच्चतम | 50 | To visit once in |
| 2 | Physician (Medicine) | | Medicine / DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | वयोमर्यादा 70 वर्ष | | every week. Rs. 2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked of his/ her specialty, maximum to Rs. 5000/- per visit |
| 3 | स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ Obstetrician & Gynaecologist | 6 | 1) MBBS with MD / MS Gyn / DGO / DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 70 वर्ष | 50 | |
| 4 | बालरोग तज्ञ Pediatrician | 6 | 1) MBBS with MD Paed / DCH / DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 70 वर्ष | 50 | |
| 5 | नेत्ररोग तज्ञ Opthalmologist | 6 | 1) MBBS with MS Opthalmologist / DOMS 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 70 वर्ष | 26 | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her specialty, maximum to Rs.5000/ per visit |
| 6 | त्वचारोग तज्ञ Dermatologist | 6 | 1) MBBS with MD (Skin / VD), DVD, DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 70 वर्ष | 26 | |
| अक्र | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एका वर्षात एकूण भेटी | एकत्रित मासिक मानधन (रूपये) |
| 7 | मानसोपचार तज्ञ Psychiastrist | 6 | 1) MBBS with MD Psychiatry / DPM/DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 70 वर्ष | 26 | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her specialty, maximum to Rs.5000/ per visit |
| 8 | कान – नाक – घसा तज्ञ ENT Specialist | 6 | 1) MS ENT / DORL/ DNB 2) Maharashtra | उच्चतम वयोमर्यादा | 25 | |
| | | | Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | 70 वर्ष | | |

अर्जदाराच्या वरील मुलाखती नंतर निवड सुचीमधील पात्र उमेदवारांना गुणवत्तेनुसार वरील प्रसिध्द केलेल्या जागेवर नियुक्त्या दिल्या जातील व उर्वरीत पात्र उमेदवारांची प्रतिक्षायादी ठेवण्यात यईल. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदावर प्रतिक्षायादी मधील उमेदवारामधुन गुणवत्ता यादी प्रमाणे उमेदवारास नियुक्ती दिली जाईल.

अर्जदराची वयोमर्यादा-

1. अर्ज भरण्याच्या दिनांकास उमेदवाराचे वय जाहिरातीमध्ये विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.
2. मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ यांची वयोमर्यादा 70 वर्ष राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

अर्ज भरण्या बाबतच्या सुचना-

1. उमेदवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.
2. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात नमूद करावी.
3. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष )अचूक नमुद करावे.
4. अर्जात उमेदवाराचे लिंग व वैवाहिक दर्जा या बाबतची माहिती नमूद करावी.
5. अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Certificate) तसेच नावत बदल असल्यास (Govt. Gazette) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
6. अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:च्या वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे.
7. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
8. उमेदवाराने अर्जामध्ये आपला जात, धर्म हा तपशील अचूकपणे नमूद करावा.
9. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.
10. अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.
11. अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

शैक्षणिक अर्हता/पात्रता-

1. शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.
2. उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.
3. अर्ज भरत असताना पात्रता परिक्षेत अंतिम वर्षात मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी, अर्जातील नमुद टक्केवारीसी न जुळल्यास, असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.
4. उमेदवारांनी मुलाखतीवेळी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका व इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.
5. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे..
6. उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

अनुभव –

1. शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थांमधील अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करू नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.
2. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना अर्जदाराने शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेच्या अनुभव प्रमाणपत्रामधील दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.
3. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

संगणक अर्हता-

1. MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा..

लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र-

१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि.२३/०७/२०२०. पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत.
२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे..

अर्ज शुल्क (विशेषतज्ञ वगळुन)–

१. उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्कासाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- असे अर्जाचे शुल्क असेल. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. “ INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY PANVEL”
२. राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षा व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. असे अर्ज अपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी-

१. उमेदवाराने अर्जावरील फॉर्म वर फोटोकरीता राखीव ठेवलेल्या जागेवर त्यांचा अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.
२. अर्जदाराने स्वाक्षरी साठी राखीव ठेवलेल्या जागेत स्वाक्षरी करावी.

निवड प्रक्रिया-

या निवड प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /10670-11016/2023 दि.27.04.2023 रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे :-

1. सदर पदभरती करिता पात्र होणाऱ्या उमेदवारांची थेट मुलाखत पनवेल महानगरपालिका स्तरावरील निवड समितीमार्फत घेण्यात येईल.
2. मुलाखतीद्वारे निवड करावयाची असल्यास मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:३ व १:५ उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

गुणांकन पद्धती –

| अ.क्र | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|
| 1 | Subject Knowledge | 10 |
| 2 | “Research & Academic Knowledge ” | 10 |
| 3 | Leadership Quality | 10 |
| 4 | Administrative Abilities | 10 |
| अ.क्र | विवरण | अधिकत्तम गुण |
| 5 | **Experience** | 10 |
| | a) For Govt. Experience | 2 Marks for one year |
| | b) For Private Experience | 1 Marks for one year |
| | एकुण गुण | **50** |

पान ५ वर..

# पनवेल परिसरातील शाळांमध्ये दहीहंडी उत्सव



पनवेल : चांगू काना ठाकूर विद्यालयातील पूर्वप्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमात मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिकावैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली संकुलात दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बाल गोपाल राधा-कृष्ण बनुन आले होते.



पनवेल : श्रीकृष्ण जयंतीनिमित्त चांगू काना ठाकूर विद्यालयात पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांचा दहिहंडी कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी लहान चिमुकल्यांनी गोविंदाच्या गाण्यावर नृत्य केले व हंडी फोडली.

## महापालिका शाळेत यशाची हंडी, ज्ञानाचे थर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दहीकाला उत्सवाचे निमित्त साधून यशाची हंडी ज्ञानाची थर या अभिनवपूर्ण उपक्रमाचे आयोजन जीवन शिक्षण विद्यामंदिर पनवेल मनपा शाळा क्रमांक पाच येथे करण्यात आले होते.

शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी कीर्ती महाजन यांच्या सूचनेप्रमाणे मुख्याध्यापिका शुभ आव्हाड यांनी सर्व शिक्षकांच्या मदतीने हा उपक्रम गावकऱ्यांच्या मदतीने राबविला. दहीकाला उत्सवात गोविंदाचे थर लावून गोविंदा दहीहंडी फोडतो. त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांना ज्ञानाचे थर लावून यशाची हंडी म्हणजेच फलस्वरूपात डॉक्टर वकील आयएएस आयपीएस असे अनेक क्षेत्रांमध्ये पुढे जाऊन यशाची हंडी प्राप्त करावी असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश रामचंद्र आलदर यांनी विशेष सहकार्य करून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत हा संदेश समर्थपणे पोहचवला.



## एमसीसीएस सोसायटीत दहीहंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने श्री कृष्ण जन्माष्टमी व (दहीहंडी) गोपाळकाला उत्सव २०२३ गुरुवारी (दि. ७) आयोजित करण्यात आला आहे.

या वेळी शालेय विद्यार्थ्यांसाठी दहीहंडी उत्सव, महिलांसाठी विशेष दहीहंडी व मनोरंजनाचे खेळ(डोळे झाकन काठीन हंडी फोडणे), लहान मुलासाठी मनोरंजनाचे खेळ (कत्रिम तलाव. ट्रॅम्पोलिन) आमंत्रित मंडळांसाठी सलामीला आकर्षित बक्षीस देण्यात येणार आहे.

एमसीसीएच सोसायटी येथे सकाळी ९.३० ते १२.३० वाजेपर्यंत होणाऱ्या या कार्यक्रमांचे आयोजन सोसायटी मित्र मंडळ, पनवेल यांनी केले आहे. माहितीसाठी सुमित उल्हास झुंजारराव (९८३३३४९१९७) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये कृष्ण जन्माष्टमी



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये कृष्णजन्माष्टमीचा कार्यक्रम करण्यात आला.

यात विद्यार्थ्यांच्या कृतिशिलतेला व सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी केले होते. संगीताच्या तालावर इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला. या वेळी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका कुसुम प्रजापती, सारिका लांजुडकर, नेहा खन्ना व सर्व शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होत्या.

# उरण शहर भाजपची आढावा बैठक उत्साहात




**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण शहर भारतीय जनता पक्षाची आढावा बैठक नुकतीच आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली येथील तेरापंथी सभागृहात झाली. या वेळी त्यांनी उरण विधानसभा मतदारसंघात केलेल्या विकासकामांचा आढावा घेत उरण तालुक्यात लवकर रेल्वे सुरू होईल, अशी ग्वाही दिली.

या बैठकीस भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, उरण विधानसभा संघटक श्रीनंद पटवर्धन, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी आपल्या भाषणात म्हटले की, उरण तालुक्यात लवकर रेल्वे सुरू होणार असल्याने तालुक्यातील मुंबई येथे कामकाज करणारे कामगार व विद्यार्थी यांचा वेळ वाचणार असून खर्चही वाचणार आहे. पुढे त्यांनी आपण तयार केलेले पत्रक नगर परिषद हद्दीत घराघरात पोचवण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याची आहे, असे सूचित केले.

सरल ॲपची निर्मिती करून त्या ॲपच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी केलेल्या विकासकामांची माहिती दिल्ली कार्यालयात नोंद होईल, असे भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी सांगितले.

या बैठकीला अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष जॅस्मिन गॅस, अनुसूचित जाती जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, माजी नगरसेवक राजू ठाकूर, नंदू लांबे, नवीन राजपाल, राजेश कोळी, मीराज शेख, माजी नगरसेविका जान्हवी पंडित, आशा शेलार, प्रियांका पाटील, रजनी कोळी, युवा मोर्चा शहर अध्यक्ष निलेश पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष संपूर्णा थळी, नंदा माणगावकर, गौरी मंत्री, हस्ती मेहता, मनोहर सहातीया, हितेश शहा, संतोष ओटावकर, देवेंद्र घरत, अजित भेंडे, मनन ओटेल, परेश तेरडे, समीर कुथे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## खारघरमध्ये एनएमएमटी बसला आग

**खारघर : प्रतिनिधी, पनवेल : वार्ताहर**



खारघर सेक्टर १५ याठिकाणी बुधवारी (दि. ६) सकाळी ११.३० च्या सुमारास एनएमएमटीच्या चालत्या बसला आग लागण्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली. चालक आणि वाहकांच्या सतर्कतेने प्रवाशांना तत्काळ खाली उतरविण्यात आले. यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

घटनेची माहिती मिळताच खारघर मधील अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. या वेळी आग विझविण्याचे प्रयत्न सुरु करण्यात आले, मात्र आगीची दाहकता जास्त असल्याने संपूर्ण बस जळून खाक झाली. आगीची तीव्रता जास्त असल्याने बस जवळ असलेल्या झाडाच्या फांद्यादेखील पूर्णपणे जळून खाक खाल्या. बसला लागलेल्या आगीच्या धुराचे लोट दुरून दिसत असल्याची माहिती या घटनेचे पत्त्यक्षदर्शी दिली. नजीकच्या काळात एनएमएमटीच्या बसेसला आग लागण्याचे प्रमाण वाढले आहे. या घटनेची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## 'सीकेटी'त हिंदी काव्यवाचन स्पर्धा

पनवेल : रामप्रहर वृत्त



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदी दिवसाच्या पार्श्वभूमीवर हिंदी विभागातर्फे काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या काव्यवाचन स्पर्धे साठी उच्च माध्यमिक कला वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे हे उपस्थित होते. उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांचे मार्गदर्शन या स्पर्धेसाठी लाभले. हिंदी विभाग प्रमुख श्री साईनाथ पाटील व सहशिक्षिका संगीता देशमुख यांनी या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले.

माध्यमिक विभागाच्या सह शिक्षिका राधिका वैदु व सारिका दिवेकर यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. या स्पर्धेत उच्च माध्यमिक विभागातील २६ स्पर्धकांनी भाग घेतला. स्नेहा विनोद शिंदे (११ वी कॉमर्स) प्रथम क्रमांक, फरीहा आसिफ दळवी (१२ वी सायन्स) द्वितीय क्रमांक, आकांक्षा दिनेश सिंग (१२ वी सायन्स) तृतीय क्रमांक, सानिया सफीमूल्ला खान (११ वी संयुक्त) व अंजुम निषाद मोहम्मद शेख (१२ वी कॉमर्स) यांनी अनुक्रमे उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले.

## बँक ऑफ महाराष्ट्रने साजरा केला शिक्षक दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ महाराष्ट्र, नवी मुंबई झोनच्या नवीन पनवेल शाखेने शिक्षक दिन साजरा केला.

या वेळी बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेल शाखेच्या शाखा प्रबंधक, नम्रता कामडी व अरविंद मोरे यांनी सी.के.टी. महाविद्यालय, बी.सी.टी. कायदा महाविद्यालय, पनवेल, संजय गांधी स्मारक हायस्कुल, पाले बु., कोळवाडी वळवली या महाविद्यालयास व शाळेस भेट देऊन प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उलेखनीय कामगिरी बद्दल प्राचार्य, डॉ. संजय पाटील, प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे, प्राचार्य, धनश्री कदम, प्रा. हिमांशू अरविंद मोरे, डॉ. सुभाष भोपी, शिक्षक भाऊसाहेब निवृत्ती काळूसे, पर्यवेक्षक ईश्वर पाटील यांचा शिक्षक दिनानिमित्त बँकेतर्फे सन्मान करण्यात आला.

प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकांनी बँकेने केलेल्या सन्मानाबद्दल आभार मानले. कार्यक्रमासाठी अरविंद मोरे, अमिता कुंदर, मीनाक्षी भाकरे, राजू म्हात्रे व प्रसाद मोहोकर यांनी अथक परिश्रम घेतले.



पनवेल : खेड लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार अशोक मोहोळ यांनी बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या वेळी त्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वागत केले. या वेळी त्यांच्याच विविध विषयांवर चर्चा झाली. (छाया : अक्षय शार्दुल)



पनवेल : भाजप युवा नेते महेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पडघेचे माजी सरपंच कृष्णा पाटील, अशोक साळुंखे, तोंडरेचे माजी उपसरपंच श्रीनाथ पाटील, संदीप पाटील,राजेश पाटील, बाळाराम दाभणे आदी उपस्थित होते.

## निवडक

### अल्पवयीन तरुणीचे अपहरण



**पनवेल :** तालुक्यातील डेरवली गाव येथे राहणारी एका अल्पवयीन तरुणीचे कायदेशीर राखवलीतून अपनयन करण्यात आल्याची घटना घडली आहे. याबाबत तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. संजना राजकुमार राठोड (वय ११) अंगाने सडपातळ, उंची अंदाजे चार फूट पाच इंच, रंग गोरा, केस वाढलेले, चेहरा गोल, डोळे काळे, नाक सरळ, अंगात गुलाबी टॉप, लेगीज पॅन्ट व पायात काळी स्लीपर आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे (०२२२७४५२४४४) किंवा पोलीस उपनिरीक्षक आकाश पवार (९२७०४५३३१४) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### उरण महाविद्यालयात शिक्षक दिन

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ प्रा. व्हि.एस. इंदुलकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एच. के. जगताप होते. सूत्रसंचालन ईकरा मुक्री हिने केले तर आभार प्रचिती माळी हिने मानले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. प्रा. अनुपमा कांबळे, प्रा. रामकृष्ण ठावरे, प्रा. हन्नत शेख, प्रा. पूजा गुप्ता, प्रा. निलोफर आदी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ. जिज्ञासा कडूचे पत्रकारांकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दै. वादळवाराचे संस्थापक दा.चां.कडू गुरुजी यांची नात आणि संपादक विजय कडू यांची सुकन्या जिज्ञासा कडू हिने एमबीबीएस परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन इंटर्नशिप पूर्ण केली. ही बाब अभिमानास्पद असून जिज्ञासाचे यश हे भावी डॉक्टरांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत दै. किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर यांनी बुधवारी (दि. ६) येथे व्यक्त केले. पनवेलमधील पत्रकारांनी पत्रकाराच्या मुलीच्या यशाबाबत अभीष्टचिंतनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या वेळी ते बोलत होते.

जिज्ञासाला नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम कॉलेजमध्ये केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, संस्थेचे चेअरमन डॉ.कमलकिशोर कदम, डॉ. सुधीर कदम, डीन डॉ. नरशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या सोहळ्यात पदवी प्रदान करण्यात आली. पुढे पोस्ट ग्रॅज्युएशन करण्याचा विचार असल्याचे तिने या कार्यक्रमादरम्यान सांगितले.

या वेळी जिज्ञासाने आपली पदवी ही आई-वडील आणि आजोबा दा.चां.कडू गुरुजी यांना समर्पित करीत असल्याचेही नमूद केले. मुलीच्या सत्काराने विजय कडू व भारती कडू भावूक झाले होते. या कार्यक्रमास पत्रकार संजय कदम, निलेश सोनावणे, रत्नाकर पाटील, प्रकाश म्हात्रे, अनिल भोळे, अनिल कुरघोडे, हरेश साठे, प्रवीण मोहोकर, राज भंडारी, साहिल रेळेकर, मयूर तांबडे, रवींद्र गायकवाड, चंद्रकांत शिर्के, अनिल राय, विशाल सावंत, असीम शेख, सुभाष वाघपंजे, शंकर वायदंडे आदी पत्रकारांसह ॲड. परेश गायकवाड, भैरवी कडू-गायकवाड आदी उपस्थित होते.



## पनवेलच्या बापटवाड्यातर्फे कृष्णजन्म सोहळा

**पनवेल : प्रतिनिधी**

गोकुळ अष्टमी म्हटले की पनवेलच्या बापट वाड्याचा गोकुळाष्टमीचा उत्सव डोळ्यासमोर येतो. यंदा या उत्सवाचे यंदा २९४ वे वर्ष आहे. ही बापटांची अकरावी पिढी असेल ज्यांनी ही उत्सवाची परंपरा अखंड ठेवली - तेवढ्याच उत्साहाने श्रद्धेने एकही वर्ष खंड न करताहा उत्सव साजरा केला. दोन वर्षांपूर्वी बापटवाडा पाडल्याने यंदा बल्लाळेश्वर मंदिरात कृष्णजन्म साजरा करणार पण दहीहंडी बांधणार नसल्याचे राजेंद्र बापट यांनी सांगितले.



वाडा रीडेव्हलप होईल आणि उत्सव अनुभवता येईल. अगदीच काही संकट आले तर तो गिरीधर स्वतः सगळे आपल्या एका करंगळीवर पेलेल आणि गोवर्धन पर्वताखाली सगळ्या पनवेलकराना आश्रय देईल, असा विश्वास पनवेलकरांना आहे काल्याच्या दुसऱ्या दिवशी पहाटे लळीताचे कीर्तन, सत्यनारायणाची पूजा आणि मग प्रसादाचे जेवण असते. संध्याकाळी पंचपदीने पुढील वर्षाच्या उत्सवाची नांदी केली जाते.

बापट वाडा पाडल्यापासून आम्ही बलाळेश्वर मंदिरात कृष्णजन्म साजरा करतो. रात्री तेथे कीर्तन करतो. गुरुवारी दुपारी काल्याचे कीर्तन होईल दही हंडीचा कार्यक्रम वाडा पाडल्याने होणार नाही. कारण हांडी बांधण्याचे स्थान बदलता येत नाही. आम्ही सगळे वाड्याच्या जवळ एकत्र येऊन तेथे मानाचे नारळ देतो. विसर्जनाची पालखी मात्र मानाचा नारळ दिल्यावर होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद होईल, असे राजेंद्र बापट यांनी सांगितले.

संपादकीय

# सारे काही तुष्टीकरणासाठी

निव्वळ मुख्यमंत्रीपुत्र म्हणून मिरवणाऱ्या उदयनिधी स्टॅलिन यांच्या वक्तव्याकडे तामिळनाडूच्या पलीकडे एरव्ही फारसे कुणी लक्षही दिले नसते. परंतु स्टॅलिन यांचा द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) हा पक्ष विरोधकांच्या देशव्यापी 'इंडिया' आघाडीचा घटक असल्याने त्यांच्या सनातन धर्मविरोधी संतापजनक वक्तव्याची सर्व पक्षांना गांभीर्याने दखल घ्यावी लागली.

**तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचे पुत्र उदयनिधी यांनी पुस्तकप्रकाशनाच्या कार्यक्रमात बोलताना सनातन धर्माविरोधात अत्यंत वादग्रस्त वक्तव्य केले. काही गोष्टींचा नुसता विरोध करून जमणार नाही तर त्यांचा समूळ नायनाट केला पाहिजे. डेंग्यूचे डास, मलेरिया, कोरोनाचा ताप यांसारख्या गोष्टींना केवळ विरोध करून जमत नाही. त्यांना नष्ट केले पाहिजे. त्याचप्रमाणे सनातन धर्मदेखील नष्ट केला गेला पाहिजे असे उद्गार त्यांनी काढले. उदयनिधी हे तामिळनाडूचे युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रीदेखील आहेत. स्वाभाविकपणे त्यांच्या या बेताल वक्तव्याबाबत देशभरात तीव्र निषेधाची प्रतिक्रिया उमटली. सनातम धर्म आणि उच्चवर्णीयांचे वर्चस्व यांचा विरोध द्रविडी पक्षांनी कायमच केला आहे, परंतु त्याहीपेक्षा तामिळनाडूतील राजकारण हे नेहमी व्यक्तिकेंद्रित अधिक राहिले आहे. तेथील अनेक राजकीय नेते हे राजकारण आणि रूपेरी पडदा या दोन्ही क्षेत्रांत वावरत असतात आणि दोन्हींकडच्या ग्लॅमरमधूनच त्यांची कारकीर्द आकार घेते. द्रविडी पक्षांची अधिकृत भूमिका कथित धर्मनिरपेक्षतेची असली तरी या पक्षांचे अनेक नेते व्यक्तिगत जीवनात अतिशय धार्मिक असल्याचेही दिसले आहे. त्यामुळेच निव्वळ अल्पसंख्याकांचे तुष्टीकरण करण्यासाठी अनेकदा त्यांनी हिंदूविरोधी भूमिका घेतली आहे. उदयनिधी यांचे हे विधानही बहुदा तसेच असावे. मुंबईत इंडिया आघाडीची बैठक सुरू असतानाच त्यांनी हे विधान केले हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लागलीच उदयनिधी यांच्या या वादग्रस्त विधानाचा समाचार घेतला. तुष्टीकरणाच्या राजकारणासाठी विरोधकांच्या इंडिया आघाडीने सनातन धर्माचा अवमान केला आहे अशी टीका शहा यांनी केली. देशात हिंदूंचा दहशतवाद सुरू आहे असे या इंडिया आघाडीतील काही मंत्री म्हणतात. केवळ मतांचे राजकारण व तुष्टीकरण यासाठी हे सुरू आहे. परंतु सनातन धर्माच्या विरोधात आघाडीचे नेते जितके बोलतील तितके त्यांचे बळ कमी होत जाईल हे त्यांनी ध्यानात ठेवावे असा इशाराही शहा यांनी दिला. हिंदू धर्मियांना विरोध करणे आता परवडणारे नाही हे बहुदा इंडिया आघाडीतील अनेक घटक पक्षांच्या नेत्यांच्याही ध्यानात आलेले आहे. त्यामुळेच काँग्रेसच्या नेत्यांनी उदयनिधी स्टॅलिन यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर सुरूवातीला मौन पाळले तर नंतर सावध पवित्रा घेऊन खुलासा केला. काँग्रेस पक्षाचा सर्वधर्मसमभावाच्या तत्त्वावर विश्वास आहे. काँग्रेस पक्ष सर्व धर्मांचा आदर करतो अशी सारवासारव त्यांनी नंतर केली, परंतु त्याचवेळी प्रत्येक राजकीय पक्षाची स्वतंत्र विचारसरणी असते व त्यांना ती मांडण्याचा अधिकार आहे, अशी पुस्तीही जोडली. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी उदयनिधी यांचे वक्तव्य मान्य नसल्याचे म्हटले तर केजरीवाल यांनी मी सनातन धर्माचा आहे असेच सांगून टाकले. अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी मात्र या वक्तव्यावर अद्यापही मौन बाळगले आहे. त्यांचे हे मौन पाहूनच आता सनातन धर्माचा अपमान केल्याप्रकरणी इंडिया आघाडीने देशाची माफी मागावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे आणि ती रास्तच आहे.**

# आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवण्याची फॅशन

आपल्याकडे डान्स बार, क्लबमध्ये जाणे एक फॅशन आहे त्यामुळे सगळीकडे त्याचे पेव फुटत आहे तशीच वृध्दाश्रमाची फॅशन होत असल्याने पनवेल, नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील वृध्दाश्रमाच्या जाहिराती वर्तमानपत्रात दिसतात. ते थांबवण्यासाठी जनरेशन गॅप भरली पाहिजे. नवरा-बायको दोघेही नोकरी करीत असतील तर घरात काळजी घेण्यासाठी कोणी नाही म्हणून त्यांना वृध्दाश्रमात ठेवणे ठीक आहे, पण फॅशन म्हणून ठेवणे चूक असल्याचे मत समाज शास्त्राचाचा विद्यार्थी (एमएसडब्ल्यू) अजिंक्य गजाकोश याने नवीन पनवेलमधील अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक कट्ट्यावर ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधताना मांडले. त्यात सत्य आहे यामध्ये शंका नाही.

आपण मातृ दिन, पित्रु दिन साजरा करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून त्यांच्याबद्दल बेगडी प्रेम दाखवणाऱ्या आपल्या आई-वडिलांना घरातील एक अडचण समजत असून एक तर त्यांना वृध्दाश्रमाचा रस्ता दाखवतात नाहीतर त्यांचा शारीरिक आणि मानसिक छळ करीत असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये गरीब, श्रीमंत किवा उच्च शिक्षित असा भेदभाव नाही सगळीकडे सारखेच असते. आज घरात वृध्द माणूस म्हणजे अडचण वाटू लागले आहेत. परदेशात राहणाऱ्या मुलांना आपल्या आई-वडिलांचा घरात मृत्यू झाल्याचे अनेक महीने माहीत नसल्याच्या किंवा त्यांच्या अंत्यसंस्कारला उपस्थित राहू शकत नसल्याने व्हॉट्सअॅपवर दाखवा सांगणाऱ्या आजच्या तरूणांच्या बातम्या आपण वाचत असतो.

श्रीमंत असो वा गरीब आई शेवटी आईच असते मुलगा किती ही मोठा झाला तरी तिला तो लहानच असतो. आपले किती ही हाल झाले तरी ती मुलाची काळजी करीत असते. याचे उदाहरण म्हणजे नवी मुंबईत राहणाऱ्या एका मध्यमवयीन महिलेने आपल्या पतीच्या निधनानंतर लोकांची भांडी घासून मुलाला मोठे केले, पण त्याला दारूचे व्यसन लागले. त्यामुळे नोकरी नाही आईच्या पैशावर जगताना मुलगा आईला काम करून आल्यावर रात्री एक तासही झोपू देत नाही. आई आजारी आहे तरी रात्री घरी आल्यावर तिला मारतो, मोठयाने आवाज करीत राहतो. प्रसंगी नशेत आईजवळ अश्लील वर्तन करण्याचा ही प्रयत्न करतो. आई रडत तक्रार करते, पण आपण त्याला सोडून गेलो तर त्याला खायला कोण घालेल म्हणून त्याला सोडून जायला ही तयार नाही. आपल्या मुलाच्या काळजीने त्याच्या सगळ्या चुका ही ती माफ करतांना दिसते .



**खबरबात**
**नितीन देशमुख**

मदर्स डे म्हणजे मातृदिन ही आपण साजरा करतो. आईबरोबर सेल्फी काढून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकतो. आपले आईवर किती प्रेम आहे हे मित्रांना दाखवण्याचे नाटक करतो असेच म्हणावे लागेल. कारण याच कालावधीत ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक आणि मानसिक त्रास दिल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात दाखल होत असल्याची धक्कादायक माहिती सोशल वर्कर आसावरी जाधव यांनी दिली. या वेळी त्यांनी उच्च शिक्षित आणि उच्च वर्गीय महिला आणि पुरुष ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक आणि मानसिक त्रास देताना अश्लील बोलतातच पण त्यांच्या खाजगी भागाला काठीने टोचण्या पर्यंत त्यांची मजल जात असल्याचे सांगितले. आई -वडिलांवरून वरुन वाद झाल्यास तरूण पिढी विभक्त होण्याची टोकाची भूमिका ही घेताना दिसत आहेत. यावरून मदर्स डे हा सेल्फी काढून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकण्यापुरताच असतो हे लक्षात येते. त्यामुळे आजची तरुण पिढी कोठे चालली आहे असा प्रश्न पडत आहे.

याच वेळी पनवेल-रसायनी रस्त्यावर असलेल्या कसळखंड येथील दातार इंस्टीट्यूट मध्ये वृध्दाश्रमातील आजी-आजोबांसाठी संजय दातार हे दरवर्षी आंदोत्सव साजरा करतात. रायगड जिल्ह्यातील व नवी मुंबईसह ठाणे जिल्ह्यातील वृध्दश्रमातील ३०० पेक्षा जास्त आजी-आजोबा यामध्ये सहभागी होतात. मराठी पध्दतीने दिवा ओवाळून प्रत्येकाचे स्वागत करण्यात येते निरनिराळे खेळ, गाणी, नृत्य व ड्रामा असे भरगच्च कार्यक्रम ठेवण्यात येतात. या वेळी 'ओ, मेरी जोहरा जबिन' म्हणत आजोबांचे नृत्य पाहून सत्तरी पूर्ण केलेल्या आजींनीही ताल धरल्याचे पाहून अनेक आजी - आजोबांचे हृदय धडकू लागते त्यांच्या तारुण्यातील आठवणी जागृत झाल्याचे दिसून येत. 'कोई लौटा दे मुझे मेरे बिते हुए दिन' असेच त्यांना वाटते या वेळी त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मला समाधान मिळते असे संजय दातार सांगतात. चहा, नाष्टा व जेवणाचे वेळी आग्रह करून वाढणारे आणि प्रत्येकाची चौकशी करणारे संजय दातार, प्रशांत नायर, चेतना अभ्यंकर व त्यांचे सहकारी पाहून या ज्येष्ठांचे डोळे पाणावतात त्यांचे कौतुक करतात.

खारघरच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील एमएसडब्ल्यू करणारे विद्यार्थी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांचा अभ्यास आपल्या प्रोजेक्टसाठी करीत आहेत. त्यासाठी त्यांनी पनवेल स्टेशनच्या पूर्वे ला असलेल्या कट्ट्यावर रोज सकाळ - संध्याकाळ एकत्र येत असलेल्या अश्वत्थामाचे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश विचारे, सचिव साहेबराव जाधव, गोपाल धारपवार, सुरेन्द्रनाथ पाटील यांची भेट घेतली. त्यांनी इथे विक्रीकर, रेल्वे, शिक्षण, पुरवठा अशा विविध शासकीय खात्यातून, बँक, खासगी क्षेत्र, कामगार संघटना अशा क्षेत्रातून निवृत्त झालेली वेगवेगळ्या प्रांतातील अनुभवी माणसे आहेत. आपल्या सोसायटीतील विजेचा किवा पाण्याचा प्रश्न असो नाही तर रेल्वे किवा एनएमएमटीच्या बसचा प्रश्न तो सोडवण्यासाठी व परिसरातील समस्या सोडवण्यासाठी आपली वेदना, दुखः विसरून ते काम करीत असतो. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यालयात फेऱ्या मारतो. यामधील अनेक प्रश्न सुटले नाही म्हणून आमचे काही अडणार नसते तर आजच्या तरुण पिढीला आपल्याला भेडसावणारे प्रश्न सोडवण्यासाठी वेळ नसतो त्यांचे प्रश्न सोडवण्याचे काम आम्ही करीत असल्याचे सांगितले.

शासनाने ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदा केला. त्यांचा सांभाळा न करणाऱ्या मुलांना त्या कायद्यामुळे शिक्षा होऊ शकते असे असतांनाही या कायद्याची भीती कोणाला वाटत नसल्याचे ते सांगतात. कारण आपल्या मुलासाठी शेवटी आई-वडील सगळे विसरून आपली तक्रार मागे घेतात. त्यामुळे या कायद्याखाली शिक्षा होण्याचे प्रमाण कमी आहे. त्यानंतर आपले अनुभव सांगाताना या विद्यार्थ्यानी आपण भेट दिलेल्या शासनाच्या वृद्धाश्रमांची अवस्था खूप खराब असल्याचे संगितले. तेथे त्यांना साधी कंबळ किंवा बेड ही व्यवस्थित नसतो, त्यांची काळजी व्यवस्थित घेतली जात नसल्याचे दिसून आले. फक्त कागदोपत्री उपक्रम घेतल्याचे दाखवले जाते पण तेथील माणसांजवळ चौकशी केल्यावर लक्षात येते की असे कोणतेही उपक्रम राबवले जात नाहीत. फक्त हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच ठिकाणी चांगली सोय असते.

> **वृध्दाश्रम म्हणजे 'केअर होम' म्हणतात पण नाव बदलली तरी घर ते घर असते. कुटुंबात रहाण्यात आणि तेथे राहण्यात फरक असतोच . आपलीच मुले असल्याने ते कायद्याचा वापर करीत नाहीत पण तो करायला पाहिजे कारण ते जिवावर बेतू शकते. आयुष्यात आपण . लहान मुल , आई - वडील या भूमिका राबवताना खुश असतो तसेच वृद्धत्वात ही आनंदी राहिले पाहिजे**
>
> **-शोभा वाघमारे**

बदलते तंत्रज्ञान

## सिमकार्डचे नवे नियम मोडणाऱ्यांना होणार दंड




बोगस सिमकार्ड वाढल्याने फ्रॉडही वाढले आहेत. त्याला आळा घालण्यासाठी ट्रायने सिम कार्ड नियमांमध्ये बदल केले आहेत. हे बदल १० ऑक्टोबरपासून लागू होणार आहेत. विक्री होत असलेल्या सिम कार्ड पॉईंटवरून अशी सिम चालू केली जात होती. यामुळे या विक्रेत्यांवरच जरब बसवण्यात येत आहे.

जर कोणी ३० सप्टेंबरनंतर विना रजिस्ट्रेशन सिम कार्ड विकले तर १० लाख रुपयांचा दंड लावला जाणार आहे. आता गल्लो गल्ली कोणीही सिमकार्ड विकू शकणार नाहीय. आधार आणि पासपोर्ट सारखी तपासणी केली जाणार आहे यानंतरच नवे सिम दिले जाणार आहे. पोलिस व्हेरिफिकेशनही केले जाणार आहे.

जर तुमच्या नावावर कोणता फौजदारी गुन्हा नोंद असेल तर फसवणुकीच्या गुन्ह्यात असाल तर तुम्हाला सिमकार्ड विकण्याचे लायसन दिले जाणार नाही. सिम कार्ड विकण्यासाठी लायसन लागणार आहे. तुम्ही कोणाला लायसन वापरण्यासाठी देत असाल तर तुमचा एजंट आणि वितरक यांचीही पोलिस पडताळणी होईल.

सिम विक्रेत्याला आधार आणि पासपोर्ट तपशीलांसह कॉर्पोरेट ओळख क्रमांक आणि व्यवसाय परवाना यांसारखी काही कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. सिम विक्रेत्याला आधार आधारित ई-केवायसीसारखे बायोमेट्रिक तपशील द्यावे लागणार आहेत. टेलिकॉम ऑपरेटर आणि पीओएस यांच्यामध्ये लेखी करार करावा लागणार आहे. यामध्ये ग्राहक नोंदणी, कामाचे कार्यक्षेत्र आणि नियमांचे उल्लंघन झाल्यास कोणती कारवाई होईल याचा उल्लेख असणार आहे. जर कोणतीही चूक केली तर २४ तासांच कायमचे ब्लॉक केले जाणार आहे. जर कोणी ३० सप्टेंबरनंतर विना रजिस्ट्रेशन सिम कार्ड विकले तर १० लाख रुपयांचा दंड लावला जाणार आहे.

# गोविंदा रे गोपाळा... गोपाळकाल्याचे महत्त्व

कृष्ण जयंतीचा उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपाळकाला असे म्हणतात. दहीहंडी आणि कृष्णजन्माष्टमी यांच्या निमित्ताने हा प्रसाद तयार केला जातो. श्रीकृष्ण जयंती व्यतिरिक्त वर्षभरात जेव्हाजेव्हा काल्याचे कीर्तन होते तेव्हा तेव्हा त्या कीर्तनानंतर गोपाळकाला होतो. म्हणूनच त्या कीर्तनाला काल्याचे कीर्तन म्हणतात. ज्ञानेश्वरीचे किंवा दासबोधाचे पारायण, किंवा अनेक दिवस चालणाऱ्या अशाच एखाद्या ग्रंथवाचनानंतर, अथवा कीर्तन महोत्सवामध्ये शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन होते. वारकरी संप्रदायात वारीची सांगता गोपाळकाला करूनच होते.

कृष्ण जयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. महाराष्ट्रात विशेषतः कोकणात या उत्सवानिमित्त दहीकाला होतो. श्रीकृष्ण त्याच्या बालपणी आपल्या मित्रांसह गोकुळातील घरांमध्ये जाऊन टांगलेल्या शिंकाळ्याच्या मडक्यातील दही-लोणी खात असे. त्यासाठी मुले मानवी मनोरा करून मडके फोडीत असत. ही परंपरा आजही भारतात दहीहंडीच्या रूपाने साजरी केली जाते. 'गोविंदा आला रे आला, गोकुळात आनंद झाला' असे गाणे गात अनेक लहान थोर पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात.



**निमित्त**

कित्येक ठिकाणी गोपाळकाला करून कृष्ण चरित्रातील सोंगे आणण्याचाही प्रघात आहे.

गोपाल म्हणजे गायींचे पालन करणारा. काला म्हणजे एकत्र मिसळणे. पोहे, ज्वारीच्या लाह्या, धानाच्या लाह्या, लिंबाचे वा आंब्याचे लोणचे, दही, ताक, चण्याची भिजविलेली डाळ, साखर, फळांच्या फोडी इत्यादी मिसळून तयार झालेला हा एक खाद्यपदार्थ असतो. हा कृष्णास फार प्रिय होता, असे सांगितले जाते. श्रीकृष्ण व त्याचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर हा तयार करीत असत व सर्वजण वाटून खात असत असे मानले जाते.

दहीहंडी (ज्याला गोपाळकाला किंवा उत्लोत्सवम् असेही म्हणतात) हा भारतातील एक मनोरंजन आणि स्पर्धात्मक कार्यक्रम आहे, जो कृष्ण जन्माष्टमी या कृष्णाचा जन्म साजरा करणाऱ्या हिंदू सणाशी संबंधित आहे. कृष्ण जन्माष्टमीच्या आदल्या दिवशी ऑगस्ट किंवा सप्टेंबरमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमासाठी एक मटके उंच ठिकाणी लटकवलेले असते. हे मातीचे भांडे दही, लोणी किंवा इतर दुधाच्या पदार्थाने भरलेले असते. हे भांडे गाठण्यासाठी किंवा तोडण्यासाठी तरुण पुरुष आणि मुले, तसेच आजकाल मुलींचा संघ तयार करून मानवी पिरॅमिड बनवतात. यादरम्यान लोक त्यांना घेरतात, गातात, संगीत वाजवतात आणि त्यांचा जयजयकार करतात.

हा एक सार्वजनिक देखावा आणि जुनी परंपरा आहे. अगदी अलीकडे दहीहंडीला मीडिया कव्हरेज, बक्षीस रक्कम आणि व्यावसायिक प्रायोजकत्वाने भरभरून मिळत आहे. हा कार्यक्रम कृष्णाच्या आख्यायिकेवर आधारित आहे, जो त्याच्या लहानपणी मित्रांसोबत गोकुळमधील घरांतून लोणी आणि दही चोरून न्यायचा. म्हणूनच त्याला माखन चोर किंवा लोणी चोर असेही म्हटले जाते. गोकुळामधील लोक त्यांची भांडी उंच ठिकाणी लटकवून त्याची चोरी टाळण्याचा प्रयत्न करायचे, परंतु कृष्ण त्यांच्यापर्यंत पोहचण्याचे अनेक सर्जनशील मार्ग शोधून काढायचा.

**(साभार : विकीपिडीया)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : येथील ओंकार बालवाडीच्या लहानग्या विद्यार्थ्यांनी शाळेत कृष्णजन्म साजरा केला. या वेळी मुलांनी दहीहंडी फोडून भारतीय सणाचे महत्त्व साकारले.** (छाया : सौरभ नाझरे)

आरोग्य प्रहर

## साळीच्या लाह्या खाण्याचे बरेच आरोग्यदायी फायदे

गोपाळकाल्यासाठीही साळीच्या लाह्यांचा आवर्जून वापर केला जातो. साळीच्या लाह्या आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त असल्याने या लाह्यांना विशेष महत्त्व असते. पाहूयात साळीच्या लाह्यांचे शरीराला होणारे विविध फायदे..



**१. ॲसिडीटीवर उपयुक्त**

हल्ली वेगवेगळया कारणांनी बऱ्याच जणांना ॲसिडीटी होते. कधी जागरणामुळे, तर कधी जेवणाच्या वेळा बदलल्यामुळे, कधी आवश्यकतेपेक्षा जास्त किंवा मसालेदार पदार्थ खाल्ल्यामुळे ॲसिडीटीचा त्रास होतो. अशावेळी साळीच्या लाह्या अतिशय गुणकारी ठरतात. उपाशी पोटी साळीच्या लाह्या खाल्ल्यास आणखीनच चांगला उपयोग होतो.

**२. कफविकारासाठी उत्तम :** साळीच्या लाह्या खाल्ल्यास कफ कमी होण्यास मदत होते आणि आराम पडू शकतो. त्यामुळे लहान मुलांनाही साळीच्या लाह्या देण्याचा सल्ला अनेकदा घरातील ज्येष्ठ मंडळींकडून दिला जातो.

**३ . पचनक्रिया सुधारते :** लाह्या खाल्ल्यामुळे शरीराचे मेटाबॉलिझम म्हणजेच चयापचय क्रिया सुधारते. त्यामुळे खाल्लेल्या अन्नाचे व्यवस्थित पचन होते आणि शरीरातील चरबी वाढत नाही.

**४. अशक्त लोकांसाठी लाभदायक :** अशक्त व्यक्तींसाठीही लाह्या खाणे फायद्याचे असते. लाह्या पचायला जरी हलक्या असल्या तरी शक्ती देणाऱ्या असतात. त्यामुळे निमिक व्यक्तींनीही दररोज लाह्या खाव्या.

**५. हाडांना मिळते मजबूती :** लाह्यांमध्ये कॅल्शियम, व्हिटॅमिन डी मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे हाडांना बळकटी देण्यासाठी लाह्या अतिशय उपयुक्त ठरतात.

**६. सौंदर्य खुलण्यास फायदेशीर :** लाह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अँटिऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे त्वचेचे आरोग्य सुधारून सौंदर्य वाढविण्यासाठीही लाह्या खाणे फायदेशीर आहे.

**७. महिलांमधील समस्यांवर गुणकारी :** मासिक पाळीदरम्यान महिलांना पोटदुखी, अंगदुखी, कंबरदुखी असे त्रास होतात, मात्र नियमितपणे साळीच्या लाह्या खाल्ल्यास हे त्रास काही प्रमाणात कमी होऊ शकतात.

**८. हृदयाचे कार्य सुधारण्यास मदत :** हृदय व रक्तवाहिन्यांचे कार्य सुरळीत करण्यासाठी लाह्या अतिशय उपयुक्त असतात. रक्तदाब नियंत्रणात राहण्यासही लाह्यांचा उपयोग होतो. त्यामुळे भविष्यात हृदयविकार उद्भवू नये किंवा उद्भवला असेल तर तो आटोक्यात राहण्यासाठी लाह्या खाणे हा सर्वोत्तम उपाय आहे.

पान २ वरुन

3. अर्जदाराच्या अर्जाची छाननी करून थेट मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची यादी थेट मुलाखतीच्या वेळी सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.
4. समान गुण प्राप्त झाल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
5. थेट मुलाखतीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची यादी व प्रतिक्षा यादी पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
6. सदर ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहील व त्यासाठी ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

सर्वसाधारण सुचना-

1. सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.panvelcorporation.com या संकेतस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे त्यांची जबाबदारी राहिल. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.
2. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णत: कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही, या पदाचा राज्य शासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार भविष्यात राज्य शासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.
3. जाहीरातीत नमूद केलेल्या पदाचे वेतन हे एकत्रित ठोक मानधन आहे.
4. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. (उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरेल)
5. थेट मुलाखतीकरिता येणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १४) कागदपत्रे जोडावीत
6. उमेदवाराने थेट मुलाखतीच्या वेळेस अर्जासोबत मुळ कागदपत्रे व त्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

इच्छुक पात्र उमेदवाराने संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील भरलेला अर्ज व त्या संबंधातील आवश्यक त्या कागदपत्रासह थेट मुलाखतीच्या दिवशी पनवेल महानगरपालिका (मुख्यालय), वैद्यकीय आरोग्य विभाग, पहिला मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -410206, या पत्त्यावर पुढील वेळापत्रकानुसार थेट मुलाखतीकरिता उपस्थित राहावे.

थेट मुलाखतीचे वेळापत्रक :-

| अ. क्र. | पदाचे नाव | मुलाखत वार | वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | आठवडयातील प्रत्येक बुधवार | मुळ कागदपत्र तपासणी सकाळी 11 ते 01 थेट मुलाखत 02 ते 04 | पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -410206, |
| 2 | भिषक (फिजीशियन) Physician (Medicine) | | | |
| 3 | स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ Obstetrician & Gynaecologist | | | |
| 4 | बालरोग तज्ञ Pediatrician | | | |
| 5 | नेत्ररोग तज्ञ Opthalmologist | | | |
| 6 | त्वचारोग तज्ञ Dermatologist | | | |
| 7 | मानसोपचार तज्ञ Psychiastrist | | | |
| 8 | कान – नाक – घसा तज्ञ ENT Specialist | | | |

मुलाखतीवेळी खालील कागदपत्रासह उमेदवाराने हजर राहणे आवश्यक आहे.

१) पुर्ण माहिती भरलेला फॉर्म
२) वयाचा पुरावा
३) पदवी/पदविका प्रमाणपत्र
४) गुणपत्रिका (सर्व वर्षाची गुणपत्रिका)
५) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (MBBS)/ Any other Medical Graduate with respective council registration(As Applicable).
६) शासकीय/निमशासकीय / खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे
7) आधारकार्डची झेरॉक्स प्रत
8) सध्याचा फोटो (2 प्रती)
9) अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Certificate) तसेच नावत बदल असल्यास राजपत्रातील(Govt. Gazette) आपल्या नावाचा उल्लेख असलेल्या पानाची झेरॉक्स प्रत.
10) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
११) अर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र
12) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
13) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) - (विशेषतज्ञ वगळुन) - State Bank of India, Punjab National Bank, Bank of Baroda, Canara Bank, Union Bank of India, Bank of India, Indian Bank, Central Bank of India, Indian Overseas Bank, UCO Bank, Bank of Maharashtra, Punjab & Sindh Bank
14) MS – CIT Certificate

टीप:- सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकते नुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समितीने राखून ठेवले आहेत. कृपया याची अर्जदारांने नोंद घ्यावी.

सही/–
(डॉ.आनंद गोसावी)
वैदयकीय आरोग्य अधिकारी
पनवेल महानगरपालिका

अर्जाचा नमुना

( ______________________________ या पदासाठी अर्ज )

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी 3.5 से.मी व उंची 4.5. से.मी) आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकीत करावा

प्रति,
मा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका

1. संपूर्ण नाव :-----------------------------------------------------
(प्रथम आडनाव )
2. वडिलाचे / पतीचे नाव :-----------------------------------------------------
3. सद्या राहण्याचा पत्ता :-----------------------------------------------------
-----------------------------------------------------
4. भ्रमणध्वनी क्रमांक :(1)------------------------------(2)----------------------
5. जन्मतारीख :----------------------- दिनांक : / /2023 रोजीचे वय ---------
राष्ट्रीयत्व --------------------
6. उमेदवार विवाहीत / अविवाहित :-------------------------------------------
7. (अ ) जात :--------------------------------- (ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे/ नाही.
8. धर्म :-------------------------------------------------------------------------
9. ई- मेल आयडी :-------------------------------------------------------------------
10. शैक्षणिक अर्हता :-
जसे MBBS/ MBBS + Physician ( MD Medicine / DNB) , Obstetrician & Gynaecologist (MD / Ms Gyn / DGO / DNB) , Pediatrician (MD Paed / DCH / DNB) , Opthalmologist (MS Opthalmologist / DOMS) , Dermatologist (MD (Skin / VD), DVD, DNB) , Psychiastrist (MD Psychiatry / DPM/DNB) , ENT Specialist ( MS ENT / DORL/ DNB)

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षांचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

11. अतिरिक्त अर्हता :-जसे पदवीत्तर

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षांचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

12. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(प्रमाणपत्राच्या प्रती)

13. अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

14. आपणा विरुद्ध न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय ?(असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

15. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैद्यता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे.)

| | |
|---|---|
| 1. | 2 |
| 3. | 4. |

16. वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असनु ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक : (अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )

## प्रतिज्ञापन
## नमुना अ

मी. श्री. /श्रीमती / कुमारी,.....................................................................................................
..................
.....................श्री.
.....................................................................................................
.....................
यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय..............................वर्ष,
राहणार.....................................................................
या द्वारे असे जाहिर करतो / करते की,

पान ७ वर..

## निवडक

### गोवर्धनी मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा



**नवी मुंबई :** येथील पुरातन पेशवेकालीन एकमेव मंदिर म्हणून आई गोवर्धनी माता मंदिराची ओळख आहे. या पुरातन मंदिराच्या जीर्णोद्धार १५ वर्षापूर्वी उद्योजक विजय म्हात्रे व आमदार मंदा म्हात्रे हस्ते गोकुळाष्टमीच्या दिवशी करण्यात आला होता. त्यानुसार दरवर्षीप्रमाणे यंदाही गोकुळाष्टमीच्या दिवशी पूजा-अर्चा करून आई गोवर्धनी माता मंदिराचा १६ वा जीर्णोद्धार सोहळा गुरुवारी (दि. ७) होणार आहे.

### 'केबीपी'च्या विद्यार्थ्यांचा गौरव



**नवी मुंबई :** रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील दोन स्वयंसेवकांचा उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून मुंबई विद्यापीठाकडून नुकताच गौरव करण्यात आला. दरवर्षी मुंबई विद्यापीठाकडून जिल्हास्तरीय बेस्ट स्वयंसेवक निवडले जातात. शैक्षणिक वर्ष २०२२-२३मधील ठाणे जिल्ह्यातील बेस्ट स्वयंसेवक म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या प्रांजल दिलीप वरखेडे आणि राजेश शांताराम गावडे या विद्यार्थ्यांची निवड झाली. दोन्ही स्वयंसेवकांना मुंबई विद्यापीठाकडून सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्राप्त झाले. त्यांच्या निवडीबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक यांनी कौतुक व अभिनंदन केले. दोन्ही स्वयंसेवकांना एनएसएस प्रकल्प अधिकारी डॉ. लक्ष्मण गवळी, डॉ. प्रणिता भाले आणि प्रा. अमित सुर्वे यांचे मार्गदर्शन लाभले.

### सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार



**नवी मुंबई :** करावे गाव येथील ज्ञानदीप विद्यालयात शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी ज्येष्ठ शिक्षक हृदयनाथ तांडेल आणि बी. आ.र तांडेल यांच्या सेवापूर्ती निमित्ताने सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ज्ञानदीप विद्यालयमधील ८० शिक्षकांचा भेटवस्तू देऊन सत्कार संस्थेचे अध्यक्ष रवींद्र नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. व्यासपीठावर उपाध्यक्ष विजय तांडेल, सचिव अरविंद नाईक, प्रसाद तांडेल, मधुकर पाटील, हरिश्चंद्र तांडेल आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक पी. पी. पाटील, इंग्रजी माध्यम मुख्याध्यापक रत्नाकर तांडेल, बकट तांडेल (प्राथमिक विभाग) मुख्याध्यापक, मनाली माळी मुख्याध्यापिका यांनी सहकार्य केले.

# नादुरुस्त 'एनएमएमटीं'मुळे प्रवासी त्रस्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या (एनएमएमटी) वारंवार नादुरुस्त होणाऱ्या बसमुळे नवी मुंबई सह अन्य शहरातील प्रवासी त्रस्त झाले आहेत.

नवी मुंबई वगळता अन्य शहारातील रस्त्यांची अवस्था बिकट असल्यामुळे त्या ठिकाणी सेवा देणाऱ्या नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या (एनएमएमटी) च्या बसेस नादुरुस्त होण्याचे प्रमाण अधिक आहे. परिणामी वेळेत बस उपलब्ध होत नसल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. १९९६ या वर्षापासून चालू झालेल्या नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमांमध्ये आजमितीस ४२५ हुन अधिक बस दैनंदिन प्रवाशांच्या सेवेत आहेत. या बसच्या माध्यमातून ८० हून अधिक मार्गांवर अनुमाने तीन लाखांहून अधिक प्रवाशांना सेवा दिली जात आहे. नवी मुंबई सह कल्याण, डोंबिवली, ठाणे, विटावा,



उरण, पनवेल खोपोली या मार्गांवर तसेच मुंबईमध्ये दादर, बोरिवली आदी मार्गांवर एन.एम.एम.टी. च्या बसेस प्रवाशांच्या सेवेमध्ये आहेत. या बस संचलनातून प्रतिदिन अनुमाने ४० लाख रुपये उत्पन्न परिवहन उपक्रमाच्या तिजोरीमध्ये जमा होते.

दरम्यान, कल्याण, डोंबिवली, पनवेल, तळोजा, खारघर, उरण या शहरांमधील रस्त्यावर पावसामुळे पुष्कळ प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे येथील रस्ते नादुरुस्तीचे प्रमाण अधिक आहे. जुलै महिन्यात पुष्कळ पाऊस असल्याने घणसोली, तुर्भे आणि आसुडगाव या तिन्ही आगारांमधील ५० ते ६० बसेस नादुरुस्त होत होत्या. आता १५ ऑगस्टनंतर पावसाने उघडीप घेतल्याने बस नादुरुस्तीचे हेच प्रमाण सुमारे ४० पर्यंत आहे. परिणामी या शहरातील मार्गावरून एनएमएमटीच्या ज्या बसेस धावतात त्या बसचे टायर फुटणे, पाटे तुटणे, बॉडी खराब होणे आदी प्रकारामुळे बसेस अधिक प्रमाणात नादुरुस्त होत आहेत. रस्ते दुरुस्तीच्या संदर्भात संबंधित महानगरपालिकांच्या शहर अभियंता विभागांना एनएमएमटी प्रशासनाने पत्र पाठवले आहे. त्यांच्याकडून कार्यवाहीची आश्वासनेही उलट टपाली प्रशासनाला कळवण्यात आली आहेत; परंतु ही कार्यवाही अतिशय धिम्या गतीने चालू असल्याचे दिसून येत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उपक्रमाचे अभियांत्रिकी विभागाकडून दररोज ४२५ बसेस उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे; परंतु दुरुस्तीच्या नावाखाली केवळ ३८० बसेस संचलनाकरिता (प्रवाशांच्या सेवेसाठी) उपलब्ध होतात. विशेषत: घणसोली आगारातील बस दुरुस्त करणाऱ्या ठेकेदाराकडील बस नादुरुस्तीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे प्रत्यक्षात नियोजित वेळापत्रकाप्रमाणे बससेवा उपलब्ध होत नसल्याने प्रवाशांची ओरड आहे. ३१,५०,८१,७१,१२५ या मार्गावरील बसेस पुष्कळ प्रमाणात अनियमित धावतात असे प्रवाशांनी सांगितले. दोन बसमधील अंतर २० ते ३० मिनिटे असताना, पुरेशा बस न मिळणे तसेच मिळालेल्या बस ब्रेकडाऊन होणे. यामुळे दोन बसमधील अंतर कधी कधी एक ते दीड तासापर्यंत जाते. त्यामुळे प्रवाशी रिक्षा किंवा अन्य उपक्रमाच्या बसने प्रवास करतात. परिणामी उपक्रमाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे.

या प्रकरणी महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी याबाबत माहिती घेऊन सांगतो, अशी प्रतिक्रिया दिली.

**बससेवेचे वेळापत्रक कोलमडतेय!**

***मार्गावर बस काढल्यानंतर त्यांचे नादुरुस्त होण्याचे प्रमाण सुमारे दिवसाला सरासरी ३० ते ४० इतके आहे. त्यामुळे प्रत्यक्षात ४२५ बस दररोज प्रवाशांच्या सेवेत उपलब्ध होणे अपेक्षित असताना केवळ ३४० ते ३५० बस प्रवासांच्या सेवेत असतात. परिणामी दररोजच्या बससेवेचे वेळापत्रक कोलमडले आहे. बस दुरुस्ती करणारे कंत्राटदार सक्षम नसल्याने आणि प्रशासनाचा म्हणावा तसा वचक त्यांच्यावर नसल्याने वेळेत बसेस दुरुस्ती होऊन मिळत नसल्याची चर्चा आहे.***

## गव्हाण विद्यालयात दहीहंडीचा जल्लोष

### चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये दहीहंडीचा कार्यक्रम झाला. विद्यालयाच्या स्थानिक शाळा चेअरमन व रयत शिक्षण शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते दहीहंडी कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

या वेळी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, 'रयत'चे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, चित्रलेखा पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, राजेंद्र चौधरी, विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या दहीहंडीसाठी विजेत्या गोविंद पथकांना पारितोषिके आणि विद्यार्थ्यांचा खाऊसाठी उपसरपंच विजय घरत यांनी गतवर्षीपासून ५००० रुपयांची देणगी जाहीर केली होती यावेळेसही त्यांनी ५००० रुपये दिले तसेच त्याचप्रमाणे पुढील वर्षीदेखील मोठ्या दहीहंडीसाठी ५५५५ रुपये आणि लहान दहीहंडीसाठी ३३३३ रुपये देण्याचे त्यांनी जाहीर केले. विद्यार्थ्यांना भेळीचे वाटप करण्यात आले.

विद्यालयातील क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर आणि गुरुकुल विभाग प्रमुख संदीप भोईर यांनी दहीहंडी सजविली. संगीताच्या तालावर मुले व मुली असे गट पाडून दहीहंडीसाठी थर करण्यात आले. यामध्ये इयत्ता दहावी (मुली) आणि दहावी ब (मुले) या दोन्ही वर्गातील गोविंदा पथक विजेते बनले. विजेत्या गोविंदा पथकांना प्रत्येकी ५०० रुपयांची रोख बक्षीसे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील व सागर रंधवे यांनी केले.

## मोरा सागरी पोलीस ठाण्याची इमारत उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागाने ८५ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेली नवी मुंबई पोलीस आयुक्त हद्दीतील मोरा सागरी पोलीस ठाण्याची नवी इमारत उद्घाटनाअगोदरच भंगारात निघाली असून सध्या या इमारतीला झाडा झुडपांचा विळखा पडला आहे.

सागरी किनारपट्टी भागातून होणारे दहशतवादी हल्ल्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि देशातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शासनाने किणारपट्टीवरील सागरी पोलीस ठाण्याना विशेष महत्त्व प्राप्त करून दिले आहे. त्या अनुषंगाने मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या मोरा, करंजा बंदर आणि घारापुरी परिसरावर नजर ठेवण्यासाठी शासनाने नवीमुंबई पोलीस आयुक्तांच्या हद्दीत नव्याने मोरा सागरी पोलीस ठाण्याची निर्मिती केली. या पोलीस ठाण्यासाठी सुसज्ज इमारत असावी, यासाठी सा. बां. विभागाकडून उरण शहरातील पेन्शन पार्क येथील भूखंडावर शासनाकडून प्राप्त झालेल्या ८५ लाख निधीतून सुसज्ज इमारतीचे बांधकाम २०१८ ते २०२० या वर्षात हाती घेतले आहे, मात्र पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या छताला पावसाळ्यात गळती लागली आहे. त्यात पावसाचे पाणी इमारतीच्या तळमजल्यावर साचून राहते.



**उरण येथील मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या नव्या इमारतीचे काम हे रेंगाळत पडले आहे. बांधकाम पुर्ण करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. इमारतीचे काम पूर्ण व्हावे, अशी पोलीस यंत्रणेची मागणी आहे**

**-दीपक इंगोले, वरिष्ठ निरीक्षक, मोरा सागरी पोलीस ठाणे**

**मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या कामासाठी शासनाकडून उर्वरित निधी उपलब्ध व्हावा यासाठी सा. बां. विभागाच्या माध्यमातून वरिष्ठ स्तरावर मागणी करण्यात आली आहे. निधी उपलब्ध झाला तर उर्वरित काम लवकरच मार्गी लावण्यात येणार आहे.**

**-नरेश पवार, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उरण**

## पनवेलमधील पार्किंगचा प्रश्न लवकरच लागणार मार्गी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील सरस्वती विद्यामंदिर शाळेच्या जागेवरील मल्टिलेव्हल पार्किंगचा प्रस्ताव बारगळला असून, सध्या याबाबत काहीच निर्णय होणार नसल्याचे दिसून येते. शाळेचे आरक्षण बदलण्यासाठी महापालिकेच्या नव्या विकास आराखड्यात बदल करावे लागणार असल्यामुळे महापालिका प्रशासनाने सध्यातरी तात्पुरत्या शाळेचे स्वरूपात चारचाकी वाहनतळाची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे.

पनवेल शहरात चारचाकी वाहने पार्किंग करण्यासाठी महापालिकेचे एकही वाहनतळ नाही. गणेशोत्सवात शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होते. वाहने पार्क करण्यासाठी जागाच शिल्लक नसल्याने ही परिस्थिती उद्भवते. भेटेल त्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला वाहन लावून वाहनचालक मोकळे होतात. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली सरस्वती विद्यामंदिर शाळा इतर शाळेत स्थलांतरित करून शाळेच्या जागेवर मल्टिलेव्हल पार्किंग बनविण्याचे प्रयत्न झाले आहे. महापालिकेच्या नव्या विकास आराखड्यात आरक्षण बदलून भविष्यात मल्टिलेव्हल पार्किंग बांधू असे ठरवून साधे पार्किंग विकसित करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला. निविदा प्रक्रिया तयार करण्याची तांत्रिक प्रक्रिया सुरु असून, पुढील पंधरा दिवसांत निविदा प्रसिद्ध करुन ठेकेदाराची नियुक्ती केली जाणार आहे त्यामुळे येत्या तीन महिन्यांत पनवेल शहरातील पहिले वहिले पार्किंग वापरता येणार आहे. सुमारे ५० चारचाकी उभ्या राहू शकतील एवढी क्षमता असलेल्या पार्किंगमध्ये स्वच्छतागृह, सुरक्षा चौकी असणार आहे. उत्सवांमुळे प्रशासनाने वाहनतळ विकसित करण्याच्या हालचाली वेगाने सुरु केल्या आहेत. महापालिकेने मराठी शाळेच्या जागेवर नवी इमारत बांधून तीन शाळा तिथे स्थलांतरित केल्या आहेत. सरस्वती विद्यामंदिराची जुनी 'झालेली इमारत पाडण्यात आली असून, या जागेवर मल्टिलेव्हल पार्किंग बांधण्याची चाचपणी करण्यात आली आली आहे. या जागेवर शाळेचे आरक्षण असल्यामुळे नवे बांधकाम करण्यात अडथळे आले. मात्र मल्टिलेव्हल पार्किंग बांधण्याचा विचार सोडून महापालिका प्रशासनाने ४० ते ५० वाहनांची व्यवस्था होईल या हेतूने वाहनतळ विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शाळेचे आरक्षण असल्यामुळे सध्या शाळेच्या जागेवर मोठे बांधकाम करता येणे शक्य नाही. आरक्षण बदलल्यानंतर भविष्यात मल्टिलेव्हल पार्किंग बांधण्यात येईल. सध्यातरी साधे वाहनतळ विकसित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.**

**-संजय कटेकर, शहर अभियंता**

## गव्हाण विद्यालयात शिक्षक दिन साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये मंगळवारी अभिरूप शाळा भरवून विद्यार्थ्यांनीच शिक्षकांच्या भूमिका साकारल्या व शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांचा अभिनव पद्धतीने सन्मान केला.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापकापासून तर शिपायांपर्यंत सर्व भूमिका साकारून शिक्षकांचा यथोचित सन्मान केला. शिक्षकांच्या भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांनी तयारीनिशी वर्गनिहाय अध्यापन केले. आजच्या दिवशी विद्यार्थी मुख्याध्यापिका झालेल्या पूजा ठाकूर, उपमुख्याध्यापक आर्यन कोळी व पर्यवेक्षिका वेदांगी पाटील तसेच जुनिअर कॉलेजच्या आजच्या दिवसाचा विद्यार्थी प्राचार्य सुमिती कोळी यांनी आजच्या दिनी वेळापत्रक निहाय नियोजन करून संपूर्ण दिवस अभिरुप शाळा चालविली.

प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी सर्व विद्यार्थी शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन केले. अभिरूप शाळेच्या विद्यार्थिनी मुख्याध्यापिका पूजा ठाकूर, विद्यार्थी उपमुख्याध्यापक आर्यन कोळी त्याचप्रमाणे अध्यापकांचे प्रतिनिधी म्हणून विद्यार्थीनी अंतरा कांबळे, पर्यवेक्षिका वेदांगी पाटील यांनी शिक्षक दिनानिमित्त केलेल्या आजच्या कामकाजाविषयी आपले अनुभव व्यक्त केले.

समारोपाच्या कार्यक्रमात उपशिक्षक आणि रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर व प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थीनी प्राचार्या पूजा ठाकूर हिने केले तर सूत्रसंचालन समृद्धी सुर्वे हिने केले. या वेळी ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, एकनाथ ठाकूर, राजेंद्र चौधरी चित्रलेखा पाटील, जयराम ठाकूर इतर सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी शिक्षक दिन विभाग प्रमुख चारुशीला ठाकूर, विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग सहायक हर्षला पाटील, जुनिअर कॉलेजचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. राजेंद्र चौधरी व सहायक प्रा. जयवंती ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नवी मुंबईत सोनेरी दहीहंडी

**नवी मुंबई :** सानपाडा सेक्टर ८ मधील हुतात्मा बाबु गेनू मैदानावर गेल्या तीन वर्षांपासून भाजप युवा नेते पांडुरंग आमले दहीहंडी उत्सवाचे व्यापक प्रमाणावर आयोजन करत असून सोन्याची दहीहंडी हे याचे खास वैशिष्ट्य आहे. पांडुरंग आमले व भाजप प्रभाग क्रमांक ३०च्या वतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले असून ६ लाख ६६ हजार ६६६ रूपयांच्या बक्षिसांची रेलचेल आहे. भाजपच्या आमदार मंदाताई म्हात्रे, निलेश म्हात्रे यांच्यासह भाजपचे पदाधिकारीही मोठ्या संख्येने या उत्सवात सहभागी होणार आहेत. या उत्सव यशस्वी करण्यासाठी पांडुरंग आमलेंसह भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी, पांडुरंग आमलेंचा मित्र परिवार, आयोजनात सहभागी असलेले साईभक्त सेवा मंडळ परिश्रम करीत आहेत.








### सर श्रावणाची..

थुई थुई नाचतच
श्रावणाची सर आली
थेंब जलाचे पिऊनी
तरुवर तृप्त झाली
पानोपानी हळूहळू
दवबिंदू स्थिरावले
मोती माळेतून जणू
धरेवरी ओघळले
रानोवनी हिरवा तो
रंग सारा विखुरला
ऊन पावसाचा कसा
खेळ न्याराच रंगला
नभ झळाळून आले
दान सुखाचे देऊनी
वसुंधरा आनंदली
साज हिरवा लेऊनी
बीज अंकुरले पोटी
काळी माती सुखावली
श्रावणाच्या या सरींनी
तनमन मोहरली
असा श्रावण श्रावण
मनी दाटला जिव्हाळा
जणू भासला भासला
असे सुखाचा सोहळा



-सुजाता कुलकर्णी, आदई, पनवेल



### शिरवणे विद्यालयात

**नवी मुंबई :** भारतीय जनता पक्ष, नवी मुंबई महामंत्री आणि शिरवणे विद्यालयचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्री कृष्ण जन्माष्टमीनिमित्ताने शिरवणे विद्यालय, नेरूळ येथील प्री प्रायमरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी राधाकृष्ण यांचा वेशभूषा परिधान करून दहीहंडी उत्सव साजरा केला.

# दहीहंडी उत्सवावर पोलिसांची नजर

## ३२३ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था बिघडवून आनंदाच्या सोहळ्यात विरजण घालणाऱ्या ३२३ गावगुंडांना रायगड पोलिसांनी दणका दिला आहे. यातील ५० जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करून अदखलपात्र गुन्हे दाखल केले असून २७३ जणांना गुन्ह्याचे कृत्य होणार नसल्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.



कृष्णजन्माष्टमीनंतर गोपाळकाला अबालवृद्धांपासून सर्वच जण अतिशय उत्साहाने साजरा करतात. गोपाळकालानिमित्त ग्रामीण भागापासून शहरी भागात ठिकठिकाणी दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम साजरा केला जातो. गोविंदा रे गोपाळा असा जयघोष करीत गल्लीबोळ्यातून मिरवणुका काढल्या जातात. यावर्षी आठ हजारपेक्षा अधिक ठिकाणी दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम होणार आहे. त्यात मिरवणूकाही काढल्या जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर शहरी भागासह ग्रामीण भागात प्रचंड गर्दी होते.

या गर्दीचा फायदा घेत काही समाजकंटक कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा प्रयत्न करण्याचा धोका नाकारता येत नाही. सण-उत्सवास गालबोट लागू नये, सण उत्सव आनंदात साजरे करता यावेत, यासाठी रायगड पोलिसांनी गेल्या महिन्याभरापासून कंबर कसली आहे. गोपाळकालानिमित्त दहीहंडी व मिरवणुकीच्या कार्यक्रमात वाद होऊ नये, यासाठी ३२३ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. यापूर्वी गुन्हे दाखल असलेले तसेच काही कारणास्ताव वाद निर्माण करणाऱ्या गावगुंडाना दणका देण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी सण-उत्सव आनंदात साजरे करावे, असे आवाहन रायगड पोलिसांकडून करण्यात येत आहेत.

# कुर्डुसमध्ये विहिरीवरच्या दहीहंडीचा रंगणार थरार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील पोयनाड येथील कुर्डुस गावात सन १९९१पासून विहिरीवरची दहीहंडी प्रसिद्ध आहे. ही दहीहंडी विहिरीवर बांधण्यात येते. दहीहंडी फोडण्यासाठी आजूबाजूच्या परिसरातील दहीहंडी पथके येथे येऊन या आगळ्या-वेगळ्या दहीहंडीचा थरार अनुभवतात.

मानवी मनोरे न रचता उडी मारून ही दहीहंडी फोडायची असते. दोन साथीदार



गोविंदाला विहिरीच्या कठड्यावर खांद्यावर घेतात. तेथून तो गोविंदा सरळ दहीहंडीकडे झेप घेतो. दहीहंडीला हाताचा स्पर्श झाल्यास ती हंडी फोडल्याचा मान त्या गोविंदा पथकाला मिळतो, मात्र एखाद्याचा उडी मारून दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न फसल्यावर तो सरळ विहिरीत पडतो. त्यामुळे गोविंदाला कोणतीही इजा होत नाही. उलट पाण्यात पडण्याचा वेगळा थरार अनुभवता येतो.

या दहीहंडीचे आयोजन देऊळ आळी गोविंदा पथक कुर्डुस यांच्यामार्फत केले जाते. पराग पिंगळे, सचिन पिंगळे, गुरुनाथ शेरामकर, सुशीलकुमार पिंगळे, गणेश असे सर्वजण या दहीहंडीची जबाबदारी घेतात.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION TO E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000028415** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-42/ 2023-2024 RFx E-Tender for Hiring of Vehicle at 220kV GIS Ulwe & attached Waghivali Substation under EHV (O&M) Division, Panvel for Period 01.08.2023 to 31.03.2024. **Tender Amount** Limited to Rs. 3,24,914/- **EMD Amount:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 06.09.2023, 18:00 Hrs to 13.09.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 13.09.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 14.09.2023 at 11:00 Hrs (if Possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Panvel

# कळंबोलीतील स्मशानभूमीला गवताचा वेढा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील हिंदू स्मशानभूमीतील लहान मुलांची शव दफनभूमीची दुरवस्था झाली आहे. तिथे वाढलेल्या गवत व झाडा-झुडपांमुळे जंगल सदृष्यस्थिती तयार झाली आहे. उंदीर, घुशी, साप यांचा वावर वाढला आहे. साहजिकच अंत्यविधीसाठी येणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

कळंबोली रोडपाली वसाहतीच्या मध्यवर्ती ठिकाणी विसर्जन तलावाच्या बाजूला ही स्मशानभूमी आहे. या दफनभूमीच्या डाव्या बाजूची संरक्षक भिंत घुशींनी पोखरलेली आहे. दफनभूमीच्या अवतीभोवती, पायऱ्यांवर प्रचंड झुडुपे असून, १० फुटांपर्यंत गवत वाढलेले आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राडारोडा पडला आहे. यासोबतच परिसरात खड्डे पडले आहेत. कचरा साचला आहे. रात्री-अपरात्री अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. रात्रीचा खड्डा खोदणार कोण? अनेक वेळा रात्री-अपरात्री स्मशानभूमीत दफन करण्यासाठी नातेवाईक मृतदेह घेऊन



येतात, पण खड्डा एक ते दोन फूट खोदला जातो. रात्रीच्या वेळी वाढलेल्या गवतामुळे खोदकाम करण्यास कर्मचारी पुढे येण्यास धजावत नाहीत. स्वच्छतेकडे लक्ष दिले जात नाही. स्मशानभूमीत सुविधांचा अभाव आहे. अस्वच्छता, संरक्षण भिंत व चौथऱ्याची झालेली दुरवस्था यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत.

महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी कळंबोलीचे भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी पालिकेकडे केली आहे. त्या अनुषंगानेच तत्काळ गवत काढले जाईल, असे आश्वासन पालिकेकडून देण्यात आले आहे.

**या ठिकाणचे गवत खूप वाढले आहे. नागरिकांना दुःखाच्या प्रसंगी तरी गैरसोय होऊ नये म्हणून पालिकेकडे विनंती केली आहे. पालिकेने जर हे गवत चार दिवसात काढले नाही तर मी स्वतः हे गवत काढणार आहे.**

**-रविनाथ पाटील,**
**अध्यक्ष, कळंबोली, भाजप**

# जासई हायस्कूलमध्ये शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज, दहागाव विभाग जासई येथे मंगळवारी (दि. ५) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा झाला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील हे लाभले होते. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिकविताना आपणास आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ देणारे व आपल्या जीवनात आदराचे स्थान असलेल्या सर्व शिक्षकांना शिक्षक दिनानिमित्त मी हार्दिक शुभेच्छा देतो. विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. इ. दहावीतील विद्यार्थ्यांनी इ. पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करून स्वतः शिक्षकाची भूमिका अनुभवली. विद्यार्थ्यांनीही आजच्या शिक्षक झालेल्या विद्यार्थी-शिक्षकाविषयी रंजक अनुभव कथन केले.

विद्यालयाच्या उपप्राचार्य एस. एस. पाटील, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नूरा शेख, उपक्रमशील विज्ञान शिक्षिका एस. ए. ठाकूर यांनीही मनोगत व्यक्त करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. जे. घरत यांनी केले, तर एन. एन. हुद्दार यांनी आभार मानले.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000028445** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-43/2023-2024. RFx E-Tender for Work of Providing & Fixing of Electrical Insulation, Acid & Alkali Proof Synthetic Insulation Mat at various Substations under EHV (O&M) Division, Panvel. |
| 2 | Online Downloading of the RFx | 07.09.2023, 18:00 Hrs. to 14.09.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 14.09.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno Commercial RFx | 15.09.2023 at 11:00 hrs.(if Possible) |
| 5 | Tender Amount | **Rs. 24,48,491/-** Including Taxes |
| 6 | EMD Amount | Rs. 24,485/- |
| 7 | Tender Fee | Rs. 500/- + GST |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer (O), Tel. No. 022- 2746 5410
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Divn., Panvel

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



या दिवशी काही विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून आपल्या सहकारी विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम केले. यासाठी त्यांना त्यांच्या विषय शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले.

प्राचार्य निशा नायर यांचे या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.

पान १ वरुन

## पनवेल महापालिका शिक्षणात अव्वल ठरेल

आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेचे सर्व प्रशासनातील अधिकारी व शिक्षक उत्तम पद्धतीने काम काम करीत असल्याने येणाऱ्या काळात पनवेल महापालिका शिक्षणात अव्वल ठरेल.

आयुक्त गणेश देशमुख यांनी सांगितले की, राज्य शासनाचे शाळांना प्राधान्य देण्याविषयीचे महापालिकांना निर्देश होते. त्याप्रमाणे इमारत सुव्यवस्थित करणे, शाळा डिजिटल करणे, वाचनालय उभारणे, संगणक कक्ष उभारण्यावर भर देण्यात येत आहे. या कामांमध्ये सगळ्याच अधिकाऱ्यांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. पुढील काळात डिजिटल माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्याने अभ्यासक्रम सोपा वाटणार आहे. महापालिकेच्या शाळांना विविध सोयीसुविधा देण्याकडेही लक्ष देण्यात येत आहे.

या वेळी शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर पोदी शाळा क्रमांक ८ येथील मुख्याध्यापिका अश्विनी भोईर यांना आदर्श शिक्षिकेचा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला तसेच येथून पुढे दरवर्षी महापालिकेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी घोषित केले.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ८५(ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून योग्य त्या कामांकरिता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप - या निविदेमध्ये एकूण ०१ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०६.०९.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक २०.०९.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : ०७/०९/२०२३**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई.**
दुरध्वनी क्र. ०२२-२७५७१५३४
e-mail : harbournkb.ee@mahapwd.gov.in
**निविदा सुचना क्र. १० सन २०२३ २०२४**
**ई-निविदा सूचना**

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग ( उ ), कोंकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४, योग्य निविदा धारकाकडून ( कंत्राटदारांकडून) खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे ( ऑन लाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकरावण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोकण भवन, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अनु.क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | अलिबाग कोळीवाडा ते डिएसपी बंगला ता.अलिबाग, जि.रायगड येथील समुद्र धुपप्रतिबंधक बंधारा मजबुतीकरण करणे. | रु. ४,५१,१३,७६०/- |

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- दि. ०८/०९/२०२३ स. ११.३० ते २२/०९/२०२३ दु.१७.३० पर्यंत
निविदा पुर्व बैठक :- दि १५/०९/२०२३ दु.१५.०० वा. मा. मुख्य अभियंता, (सा.बां) प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, ४ था मजला, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आयोजित करण्यात आलेली आहे.
निविदा उघडण्याचा कालावधी :- दि. २५/९/२०२३ दु. १२.०० वा.

**टिप - ई- निविदेची संपुर्ण माहिती खाली नमुद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**
१. https://mahapwd.gov.in
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर व सुचना फलकावर कळविण्यात येईल)
३. कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. पअउ/निविदा/१६८५
पत्तन अभियंता यांचे कार्यालय, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई ४००६१४
दिनांक : ०४/०९/२०२३

सही/-
पत्तन अभियंता
पत्तन अभियांत्रिकी विभाग
कोंकण भवन, नवी मुंबई

पान ५ वरुन

(१)मी.....................................................................................................
...........................................................या
पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ............................. (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. 23 जुलै, 2020 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे. ( असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

(३) दिनांक 23 जुलै, 2020 रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 23 जुलै, 2020 व तद नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

सही/-

दिनांक :-

## फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे हमीपत्र



मी.श्री./श्रीमती/कुमारी..........................................................................
....................................

वय................ वर्ष................................सध्या राहणार असे लिहुन देते/देतो की, या पत्यावार ................वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-

# भारताच्या वर्ल्डकप संघ निवडीवर संमिश्र प्रतिक्रिया



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची मंगळवारी घोषणा करण्यात आली. आशिया चषक स्पर्धेत खेळणाऱ्या खेळाडूंना १५ सदस्यीय संघात संधी देण्यात आली आहे. भारतीय संघाच्या निवडीवर क्रिकेटच्या दिग्गजांनीही प्रतिक्रिया दिल्या आहेत.

१९८३च्या विश्वचषक विजेत्या संघाचे कर्णधार कपिल देव म्हणाले की, निवडकर्त्यांसाठी हा सर्वोत्तम संघ ठरू शकला असता. आता त्याच्यासाठी सर्वोत्तम पर्याय कोणता असू शकतो याचा विचार कर्णधाराला करावा लागेल. त्यांनी पुढे बोलताना, संघ जाहीर झाल्यानंतर त्यावर जास्त चर्चा व्हायला नको. संघावर विश्वास असला पाहिजे. तुम्ही कशावरही बोट दाखवू शकता. आता संघ जाहीर झाला असून हा सर्वोत्कृष्ट संघ असल्याचे सर्वांना खात्रीने सांगावे लागेल. सामन्यादरम्यान या गोष्टींवर चर्चा होऊ शकते, असे नमूद केले.

माजी भारतीय प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी लिहिले, एक उत्कृष्ट संघ निवडला गेला आहे. चला मित्रांनो, बाहेर पडा आणि काहीतरी साध्य करा आणि आनंद घ्या.

ऑस्ट्रेलियाचे माजी खेळाडू टॉम मूडी म्हणाले, भारताच्या विश्वचषक संघात आश्चर्य नाही. तुम्ही असा तर्क करू शकता की राखीव फलंदाज म्हणून सूर्यकुमार यादवच्या आधी तिलक वर्मा अधिक मजबूत खेळाडू असू शकला असता. मधल्या फळीतील डावखुरा जो काही ऑफ स्पिन देऊ शकतो.

माजी फिरकीपटू हरभजन सिंग म्हणाला, युजवेंद्र चहल संघात नसल्यामुळे मला आश्चर्य वाटले. चहल मॅचविनर आहे आणि तो संघात असायला हवा होता.

माजी जलदगती गोलंदाज इरफान पठाण म्हणाला, आगामी विश्वचषकासाठी टीम इंडियामध्ये निवड झालेल्या सर्व खेळाडूंना शुभेच्छा, बेधडक व्हा बॉईज.

रॉबिन उथप्पा म्हणाला, विश्वचषक संघात आश्चर्य नाही. काही षटके टाकू शकणारा लेफ्टी म्हणून टिलक वर्मा संघात असता तर बरे झाले असते! तरीही या टीमच्या सर्व सदस्यांना हार्दिक शुभेच्छा.

विश्वचषकासाठी निवडलेल्या भारतीय संघात रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, इशान किशन, केएल राहुल, हार्दिक पांड्या (उपकर्णधार), सूर्यकुमार यादव, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, शार्दुल ठाकूर, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव यांचा समावेश आहे.

# पावसाळी क्रीडा स्पर्धेत नांदगाव हायस्कूलचे दुहेरी यश

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धेत नांदगाव येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाने सुयश संपादित केले आहे. १४ वर्षाखालील मुलांच्या आणि मुलींच्या अशा दोन्ही कबड्डी स्पर्धेत या विद्यालयाने विजेतेपद पटकाविले.



(छाया : संजय करडे)

१४ वर्षाखालील कबड्डी स्पर्धेत नांदगाव हायस्कूलच्या मुलांच्या संघाने अंतिम फेरीत त्यांनी काकळघर हायस्कूलचा १७ गुणांनी पराभव केला, तर मुलींच्या संघाने अंतिम फेरीत मुरूडच्या सुविद्या हायस्कूलला २० गुणांनी मात दिली. पावसाळी क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांना यश मिळण्यासाठी या दोन्ही संघांचे प्रशिक्षक व शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर यांनी अथक परिश्रम घेतले.

पावसाळी क्रीडा स्पर्धेत जे संघ प्रथम क्रमांक मिळवतात त्यांना जिल्हा स्तरावर खेळण्याची संधी उपलब्ध होते. त्यानुसार नांदगाव हायस्कूलचे दोन्ही कबड्डी संघ जिल्हा स्तरावर खेळावयास पात्र ठरले आहेत.

या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष फैरोज घलटे, मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, पर्यवेक्षिका अर्चना खोत, क्रीडा समन्वयक दत्ता खुळपे, प्रतीक पेडणेकर, राहील घलटे, योगेश पाटील, सागर राऊत, संतोष बुलू, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये 'सीकेटी'च्या अन्वी निकमला कांस्यपदक

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाको इंडिया चिल्ड्रेन कॅडेट आणि ज्युनिअर राष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील अन्वी प्रशांत निकम हिने कांस्यपदक जिंकले. त्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अन्वीचे अभिनंदन करीत तिचे कौतुक केले.

युनायटेड शोतोकोन कराटे असोसिएशन इंडियाच्या वतीने आयोजित ही स्पर्धा झारखंडमधील रांची येथील हरिवंश ताना भगत इनडोअर स्टेडियममध्ये नुकतीच झाली. या स्पर्धेत सीकेटी इंग्रजी प्राथमिक विभागातील अन्वीने ७ ते ९ वयोगट आणि २० किलो वजनी गटात कांस्यपदक मिळविले आहे.

या वेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, शिक्षक सुरेंद्र ठमके, कराटे मार्गदर्शक संजय गोंधळी आदी उपस्थित होते.

## मुंबई शहर कबड्डी संघटनेची वार्षिक सभा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनची २०२२-२३ची वार्षिक सर्वसाधारण सभा येत्या रविवारी (दि. १०) सकाळी १० वाजता वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिरात आयोजित करण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष भाई जगताप यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होईल.

वार्षिक अहवाल व सभेची सूचना सर्व संलग्न संघांना हस्ते-परहस्ते मिळेल अशा तऱ्हेने वितरीत करण्यात आली आहे. ज्या कोणास ती सूचना मिळाली नसल्यास हिच सूचना असे समजून सभेस आपली उपस्थिती दर्शवावी. सभा यशस्वी करण्यास आपले सहकार्य अपेक्षित आहे, असे आवाहन या पत्रकाद्वारे सर्व संघांना सचिव विश्वास मोरे यांनी केले आहे.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ पनवेल आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन १६ व १७ ऑगस्ट रोजी नवीन पनवेल सेक्टर १८ येथील सिडको समाजमंदिरात करण्यात आले आहे.



स्पर्धा नवोदित मुली व मुले, ११, १३, १५, १७, २१ वर्षाखालील मुली व मुले, महिला व पुरुष एकेरी, ज्येष्ठ पुरुष एकेरी, पुरुष दुहेरी अशा विविध गटांत लीगकम नॉकआऊट पद्धतीने घेण्यात येणार आहे. स्पर्धेचे चीफ रेफरी डी.आर.साळसकर, तर असिस्टंट चीफ रेफरी म्हणून पराग अंकोलेकर व शामल डेब्बार्मा काम पाहणार आहेत. महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेसाठी संघ निवडताना या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा विचार केला जाणार आहे.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष एस. जी. चव्हाण यांच्या हस्ते १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता होईल. या वेळी लायन्स क्लब ऑफ पनवेलचे सेक्रेटरी अशोक गिल्डा, खजिनदार सुयोग पेंडसे, प्राजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, संजय पोतदार, नागेश देशमाने, नंदकिशोर धोत्रे, के.एस.पाटील, मधुकर भगत, मदन गोवारी, संजय गोडसे, हेमंत ठाकूर, गौतम म्हस्के, माजी अध्यक्ष मीना पोतदार, ज्योती देशमाने, भावना जेसवानी, शोभा गिल्डा यांच्यासह लायन व लिओ क्लबचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेचे बक्षीस वितरण १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. या वेळी कै. मोरेश्वर सदाशिव पोतदार व कै. मंगला मोरेश्वर पोतदार यांच्या स्मरणार्थ लायन्स क्लब ऑफ पनवेलचे माजी अध्यक्ष संजय पोतदार यांच्यातर्फे टेबल टेनिस स्पर्धेतील पुरुष व महिला विजेत्यास फिरता चषक देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना लायन्स क्लब ऑफ पनवेलतर्फे सहभाग प्रमाणपत्र तसेच विजेत्या व उपविजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी, रोख रक्कम आणि गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

# भारतीय क्रिकेटपटूंनी जिंकली चाहत्यांची मने

**कँडी : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेतील पाचवा सामना भारत आणि नेपाळ यांच्यात खेळला गेला. भारताने हा सामना १० विकेटने जिंकला. दरम्यान, भारतीय संघाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या माध्यमातून भारतीय खेळाडूंनी चाहत्यांची मने पुन्हा एकदा जिंकली आहेत.

## नेपाळच्या खेळाडूंचा अनोखा सन्मान

व्हायरल असलेल्या व्हिडीओमध्ये मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड, विराट कोहली आणि उपकर्णधार हार्दिक पांड्या दिसत आहेत. त्याचबरोबर या व्हिडिओमध्ये नेपाळचे खेळाडूही दिसत आहेत. यात भारताचे खेळाडू नेपाळच्या खेळाडूंना आशियाई स्पर्धेत पदार्पण केल्याबद्दल पदक देऊन सन्मानित करताना दिसले. याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

इतकेच नाही, तर भारतीय खेळाडूंनी नेपाळच्या संघाच्या खेळाडूंसोबत काही वेळ घालवला. सामना संपल्यानंतर नेपाळच्या ड्रेसिंग रूममध्ये जाऊन त्यांच्या खेळाडूंसोबत फोटोही काढले. याशिवाय भारताचा माजी कर्णधार नेपाळचा वेगवान गोलंदाज सोमपाल कामीला त्याच्या शूजवर ऑटोग्राफ देताना दिसला. त्यामुळे सोमपाल भावूक झाला. विशेष म्हणजे सोमपाल भारताविरुद्ध आठव्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता. त्याने ५६ चेंडूंत ४८ धावांची खेळी खेळली, ज्यात दोन षटकार आणि एका चौकाराचा समावेश होता.














दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com